| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अनिल दामोधर अंबिलवादे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना -श्री. विष्णू लोखंडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.११.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७.०२.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०३.२०११<br>(फेरसादर,दि.२५.०७.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये गॅस एजन्सीसंदर्भात माहिती मागितली आहे. सदरची माहिती गॅस एजन्सीकडून घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.११.२०१० रोजी अपिलार्थीस दिलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. १७.०२.२०११ रोजी निर्णय दिला आहे. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तहसीलदार, अंबड यांनी दि. २२.११.२०१० रोजी दिलेली असल्यामुळे अर्ज निकाली काढण्याचा निर्णय घेतला आहे.

या सर्व बाबी विचारात घेता, अपील बंद करण्याच्या निकर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनिल दामोधर अंबिलवादे,रा. गणपती गल्ली, मेन रोड,अंबड, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जाधव विकास प्रतापराव, : अपिलार्थी
रा. माहोरा, ता. जाफ्राबाद, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, माहोरा,
ता.जाफ्राबाद, जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती,जाफ्राबाद, जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जाधव विकास प्रतापराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, माहोरा, ता.जाफ्राबाद, जि.जालना- श्री. जी.व्ही.लहाने | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती,जाफ्राबाद, जि.जालना- श्री. के.एस.वनवे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११.०३.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी ही बाब मान्य केली व अपील मागे घेत असल्याचे प्रतिपादन केले.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जाधव विकास प्रतापराव,रा. माहोरा, ता. जाफ्राबाद, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, माहोरा, ता.जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती,जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पारखे अशोक सारंगधर, | : | अपिलार्थी |
| रा. बुटेगाव,ता.बदनापूर, जि.जालना | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| मुख्याधिकारी, नगर परिषद,जालना | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८४७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पारखे अशोक सारंगधर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

अपिलार्थी यांनी जालना येथील भोकरदन नाका या भागातील सर्वे नं. ११०,१११ व ११६ मधून आय.यु.डी.एफ. या योजनेअंतर्गत नगर परिषदेने स.नं. ११०, १११, ११६ मधून जमीन

संपादित केल्यावर त्यावर प्लॉट पाडून केलेल्या वाटपाबाबतची माहिती मागितली आहे. अपिलार्थीस आजपावेतो माहिती मिळालेली नाही.

सदरच्या योजनेमध्ये मागासवर्गीयांना सुध्दा प्लॉट द्यावयाचे आहेत. या सर्व बाबी पाहता, मागितलेल्या माहितीमध्ये व्यापक जनहित दिसून येत आहे. याकरिता अपिलार्थीस देय होणाऱ्या संपूर्ण माहितीच्या झेरॉक्स प्रती सादर करण्यासाठी तसेच आयोगासमोर बाजू मांडण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची पुढील सुनावणीस उपस्थिती अधिनियमातील कलम 19(8)(a) नुसार अनिवार्य करण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख दि. २०.०६.२०१२ अशी निश्चित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २०.०६.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पारखे अशोक सारंगधर,रा. बुटेगाव,ता.बदनापूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. एकनाथ रामराव गोरे, : अपिलार्थी
रा. माळेगाव, पो.गोलटगाव, ता.बदनापूर, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता,
लघुपाटबंधारे उपविभाग, अंबड, जि.जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअभियंता,जिल्हा परिषद सिंचन उपविभाग, अंबड, जि.जालना- श्री. बाबासाहेब नाथाजी सानप | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एम.के.सापधरे, उपकार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.१२.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती कार्यालयात संकलीत करण्यात आली असून सदरची माहिती अपिलार्थीस देण्यासाठी उपलब्ध असलेली माहिती कार्यालयात उपस्थित राहून हस्तगत करावी, असे कलम ७(१)नुसार दि. २४.११.२०१० रोजी विहित मुदतीत कळविले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. अपिलार्थी यांनी तदनंतर माहिती घेतली आहे. त्याप्रमाणे दि. १४.०१.२०११ रोजी उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद, उपविभाग अंबड यांना पोच दिलेली आहे.

आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एकनाथ रामराव गोरे,रा. माळेगाव, पो.गोलटगाव, ता.बदनापूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,जिल्हा परिषद सिंचन उपविभाग, अंबड, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शामराव दिनकर घोरपडे, : अपिलार्थी
रा. भराडखेडा, पो.केळीगव्हाण, ता. बदनापुर,
जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९१९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप विभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग बदनापूर, जि.जालना - श्री. ए.एस.माने | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.ए.जी.कांबळे,प्रथम लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.१२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

| | | |
|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी,जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये शनिश्वर पर्यटन स्थळ, भराडखेडा या गावातील सर्व कामासंदर्भात विस्तृत अशी माहिती मागितली आहे. सदरची माहिती संकलीत करुन अपिलार्थीस देण्यात आली आहे. त्याबाबतची पोच अपिलार्थी यांनी दि. ०.५.०१.२०१२ रोजी दिली आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. तथापि अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती देण्यामध्ये विलंब झालेला असल्याचे दिसून येत आहे. मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९)नुसार त्यांना विहित मुदतीत माहितीची पाहणी देणे योग्य ठरत होते. याची नोंद जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग बदनापूर, जि.जालना व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना यांनी घ्यावी व भविष्यात याबाबत खबरदारी घ्यावी, असे आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १७-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शामराव दिनकर घोरपडे,रा. भराडखेडा, पो.केळीगव्हाण, ता. बदनापूर,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग बदनापूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कुलकर्णी लक्ष्मीकांत नारायणराव, : अपिलार्थी
मंठा, जि. जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विशेष भूमी संपादन अधिकारी (लसिका),
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९४०,१६७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. कुलकर्णी लक्ष्मीकांत नारायणराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपजिल्हाधिकारी (लसिका),जिल्हाधिकारी कार्यालय, जालना- श्री. व्ही.वाय.अढांगळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हाधिकारी,जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०४.२०११ व ०२.०७.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (लसिका),जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये मौजे तळतोंडी, ता.मंठा पाझर तलाक क्र.७ मध्ये संपादित झालेल्या त्यांच्या जमिनीच्या भूसंपादनाबाबतची विस्तृत अशी माहिती एकूण चार मुद्यांद्वारे मागितली आहे. सदर माहिती संकलीत करुन अपिलार्थीस दि. ०२.०४.२०१२ रोजी पाहणीसाठी उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थी यांनी सदर माहितीची पाहणी केल्याचे मान्य केले.

अपिलार्थी यांच्या युक्तिवादावरुन, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मालकीच्या जमिनीच्या भूसंपादनाच्या मावेजाशी संबंधित माहिती मागितली आहे व त्यांना अद्यापि मावेजा मिळालेला नाही, असे दिसून येत आहे. यासंदर्भात अस्तित्त्वात असलेल्या कायद्यानुसार वेगळ्याने सदरचा प्रश्न सोडवून घेणे शक्य आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. तथापि अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि. २६.११.२०१० रोजीचा आहे व त्यांना विलंबाने माहिती देण्यात आली आहे. याकरिता जिल्हाधिकारी, जालना यांनी संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (लसिका), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांचा याबाबत खुलासा घेऊन भविष्यात दक्ष राहण्याच्या सूचना द्याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जिल्हाधिकारी, जालना यांनी वरीलप्रमाणे कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुलकर्णी लक्ष्मीकांत नारायणराव,लक्ष्मीकांत ॲग्रो ट्रेडर्स, मेनरोड,मंठा,जि. जालना

२.	जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (लसिका),जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| | श्री. तुषार अशोकराव फड,<br>मु. पो. धर्मापुरी, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : अपिलार्थी |
| | **विरुध्द** | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५७५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड<br>- श्री. एस. एम. मुंडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०८-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०३-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. ३०-०३-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०४-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २९-०२-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक १६-०४-२०१० रोजी देण्यात आलेली आहे. तथापि अपिलार्थीने त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे असे नमूद करुन व्दितीय अपील सादर केले आहे.

अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली होती तथापि ते अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना माहिती अपूर्ण मिळाल्याचे नमूद केले आहे. याकरिता अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांनी जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस पुढील पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १७-०४-२०१२**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तुषार अशोकराव फड, मु. पो. धर्मापुरी, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सदाशिव विश्वंभर पाटील,<br>रा. इर्ला, तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, कळंब,<br>तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०४३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, कळंब,<br>तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-०९-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८-११-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १८-०२-२०११

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०६-०३-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. तहसीलदार, कळंब यांनी त्यांच्या दिनांक ०५-०३-२०१२ च्या पत्रान्वये त्यांची नियुक्ती पथक प्रमुख म्हणून माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या परिक्षेकरिता झाली असल्याने प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची विनंती केली होती. त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन प्रकरणात सुनावणीकरिता आजची तारीख देण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. याकरिता या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8) (a) व 19 (7) मधील आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार आयोग अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करीत आहे. प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-१०-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सदाशिव विश्वंभर पाटील, रा. इर्ला, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. परमेश्वर गोविंद गोणारे,<br>रा. तिरुमला नगर, काबरानगरच्या बाजूस, पावडेवाडी रोड, नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय सह संचालक (प्रशासन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक (प्रशासन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अधीक्षक, कार्यालय सह संचालक (प्रशासन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे<br>- श्री. निवृत्ती चिमाजी शेणकर | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक<br>- श्री. मोहन मल्हारी वांझरे | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक (प्रशासन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५-०१-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १२-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४-०३-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०४-२००९ पुणे खंडपीठाकडे प्राप्त दिनांक २३-०३-२०१० औरंगाबाद खंडपीठाकडे प्राप्त |

आज रोजी सुनावणीच्या वेळी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये दिनांक ०४-०४-२००७ रोजीच्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत मागितली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती चौकशी प्रक्रिया प्रगतीपथावर असल्यामुळे त्यांना देता आली नाही व ही बाब जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (प्रशासन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी प्रथम अपील सुनावणीच्या वेळी निर्णयात नमूद केली आहे. तथापि अपिलार्थी यांच्या दुस-या एका माहिती अर्जाच्या संदर्भात मा. राज्यपाल महोदयांच्या कार्यालयाने हीच माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी यांना समजले आहे. अद्यापपर्यंत सदर अहवालाची प्रत त्यांच्या कार्यालयात मान्य होऊन प्राप्त झालेली नाही. जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती ती अपिलार्थीस देण्यात आली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता प्रकरण या टप्प्यावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १८-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. परमेश्वर गोविंद गोणारे, रा. तिरुमला नगर, काबरानगरच्या बाजूस, पावडेवाडी रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक, कार्यालय सह संचालक (प्रशासन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (प्रशासन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किशोरकुमार धरमचंद ओहरी, : अपिलार्थी
बालाजी मंदिर, गाडीपुरा, व्दारा, गणेशसिंह बिसेन, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, नांदेड<br>- श्री. सुनिल माचेवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. प्रमोद विष्णुपंत देशमुख , नायब तहसीलदार (निवडणूक), तहसील कार्यालय, नांदेड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २२-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे ती देण्यास विलंब लागला आहे. माहिती जुनी असल्यामुळे ती देण्यास विलंब होत आहे, अभिलेख शाखेत शोध घेण्याचे काम चालू आहे, संचिका प्राप्त होताच आपणास माहिती पुरविण्यात येईल, असे अपिलार्थीस दिनांक २६-१०-२००९ रोजी कळविण्यात आले आहे. नुकतीच संबंधित पोलीस स्टेशनकडून त्यांच्याकडे माहिती प्राप्त झाली आहे. त्याची प्रत त्यांनी आयोगास सादर केली सदर माहितीची एक प्रत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे पाठवावी, असे आयोगातर्फे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किशोरकुमार धरमचंद ओहरी, व्दारा, गणेशसिंह बिसेन, बालाजी मंदिर, गाडीपुरा, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणेश रामनाथ कत्रुवार, : अपिलार्थी
रा. वंजार गल्ली, कुंडलवाडी, तालुका बिलोली,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय, कुंडलवाडी, तालुका बिलोली,
जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कुंडलवाडी,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गणेश रामनाथ कत्रुवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, कुंडलवाडी, तालुका बिलोली,<br>जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कुंडलवाडी,<br>तालुका बिलोली, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-१२-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. याची गंभीर दखल आयोग घेत आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही. तसेच आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुनही अपिलार्थीच्या दिनांक ०९-१२-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कुंडलवाडी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कुंडलवाडी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-१२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश रामनाथ कत्रुवार, रा. वंजार गल्ली, कुंडलवाडी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, कुंडलवाडी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कुंडलवाडी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सिध्देश्वर नागनाथ स्वामी, : अपिलार्थी
रा. मालेगाव, ता.अर्धापूर, जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग (उत्तर) नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सिध्देश्वर नागनाथ स्वामी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, नांदेड- श्री. वहाबदिन फारुकी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बां), उत्तर विभाग, नांदेड - श्री. अ.क.बंगाळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन

असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी जिल्हा परिषदेअंतर्गत बांधलेला नळकांडी पुल हा जंगमवाडी ते बसवेश्वरनगरचा कोणता भाग जोडणार आहे, त्या भागाचे नकाशे प्रमाणित प्रतीत, त्यांची सविस्तर माहिती व रस्त्याच्या रुंदीबाबत माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात सदरच्या पुलाचे बांधकाम ग्रामपंचायत, मालेगाव अंतर्गत चालू असल्यामुळे ग्रामपंचायत, मालेगाव यांच्याकडे माहिती मागावी,असे कळविलेले आहे व अपिलार्थीच्या अर्जाची प्रत विहित मुदतीत संबंधित ग्रामपंचायतीकडे पाठविल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे संदर्भित नळकांडी पुलाच्या बांधकामाबाबत माहिती मागितली आहे. जिल्हा परिषदेच्या बांधकाम उपविभाग यांनी त्यांच्या दस्तऐवजावरुन वरील माहितीचा एक "समजुतीचा नकाशा" व रस्त्याच्या रुंदीच्या तपशीलासह माहिती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिध्देश्वर नागनाथ स्वामी, मु.पो.मालेगाव, ता.अर्धापूर, जि.नांदेड-४३१ ७५०.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बां), उत्तर विभाग,

नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिवाजी विठोबा हिवरे, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पोलीस अधीक्षक,पोलीस अधीक्षक कार्यालय,
वजिराबाद,नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर पोलीस अधीक्षक, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गृह पोलीस उपअधीक्षक, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अतिरिक्त पोलीस अधीक्षक,नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस.एस. निंबाळकर, पोलीस निरीक्षक, नांदेड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०२.२०१०<br>(फेरसादर दि. ०५.०३.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १३.११.२००९ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे संत रोहिदास पादत्राणे औद्योगिक मर्यादित संस्था, नांदेड या संस्थेविरुध्द केलेल्या चौकशीची व दाखल केलेल्या चार्जशीटची प्रत व इतर काही माहिती मागितली आहे. यासंदर्भात अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी दि. १९.११.२००९ रोजी निर्णय दिला आहे की, दाखल झालेला गुन्हा हा पोलीस तपासावर प्रलंबित असल्यामुळे सदर प्रकरणी मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१)(ज) अन्वये नाकारण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी विठोबा हिवरे,रा. जुना गंज, ढोर गल्ली, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त पोलीस अधीक्षक,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जगन्नाथ छोटुराम भगुरे,<br>रा. नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य,<br>एन.ई.एस.सायन्स कॉलेज, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव,<br>नांदेड एज्युकेशन सोसायटी, स्नेहनगर,नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जगन्नाथ छोटुराम भगुरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - प्राचार्य एन.ई.एस.सायन्स कॉलेज, नांदेड - श्री. गोविंद माणिकराव कळमसे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अध्यक्ष, नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे वकील ॲड.उत्तम मा.देशपांडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०८.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी त्यांच्या वकिलासह उपस्थित आहेत. दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. वकिलांनी युक्तिवाद केला की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली होती. तथापि "माहिती घेण्यास नकार" अशा शेऱ्यासह तो लिफाफा परत आला आहे. अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाली नाही, अशी त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांची बाजू मांडली आहे. अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती पुन्हा नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन महिती अधिकारी तथा प्राचार्य एन.ई.एस.सायन्स कॉलेज, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पुन्हा एकदा नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जगन्नाथ छोटुराम भगुरे,वनस्पतीशास्त्र विभाग,सायन्स कॉलेज,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य एन.ई.एस.सायन्स कॉलेज, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, नांदेड एज्युकेशन सोसायटी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कदम विलास समर्थराव, | : | अपिलार्थी |
| रा. मुखेड, जि.नांदेड | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| उप कार्यकारी अभियंता, | | |
| सार्वजनिक बांधकाम विभाग,पुणे | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| कार्यकारी अभियंता, | | |
| सार्वजनिक बांधकाम विभाग,पुणे | | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८३२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०२.२०१० (पुणे खंडपीठास प्राप्त)<br>दि. २४.०२.२०१० (औ.बाद खंडपीठास प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थी यांनी त्यांचे राज्य माहिती आयोगास दि.२४.०२.२०१० (पुणे खंडपीठाकडे दि. १५.०२.२०१० रोजी प्राप्त) रोजी सादर केलेले द्वितीय अपील माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) मध्ये नमूद केलेल्या विहित कालावधीमध्ये सादर केलेले नसून सुमारे ९२ दिवसांच्या विलंबाने सादर केले असल्याचे दिसून येत आहे. विलंबाचे समर्थनीय कारणही अपिलार्थी यांनी नमूद केलेले नाही.

या सर्व बाबी विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कदम विलास समर्थराव, तगलाईन गल्ली, झेंडा चौक, मुखेड, ता.मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जयराम सिध्देश्वर कंचलीवार, | : | अपिलार्थी |
| रा. किनवट, जि.नांदेड | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| नगर परिषद, किनवट, जि.नांदेड | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| मुख्याधिकारी, नगर परिषद, किनवट, जि.नांदेड | | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८३३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०४.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय घेतल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या भूमिकेतून माहिती अधिकार अधिनियमातील कलम 19(8)(a) अन्वये आयोगास प्राप्त झालेल्या

अधिकारानुसार नगर प्रशासनाचे जिल्हास्तरावरील प्रमुख असलेले अतिरिक्त जिल्हाधिकारी, नांदेड यांची प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येत आहे. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दि. ०४.०१.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि.०४.०१.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जयराम सिध्देश्वर कंचलीवार,रा. किनवट, ता.किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद, किनवट, ता.किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. मुख्याधिकारी, नगर परिषद, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, नांदेड यांना अपिलार्थी यांच्या माहितीअर्जाच्या व त्यासंदर्भातील प्रथम व द्वितीय अपिलाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मस्के बालासाहेब गोपाळराव, : अपिलार्थी
रा.केदारगुडा, पो.कवाना, ता.हदगाव,जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
औरंगाबाद यांचे कार्यालय,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
वनवृत्त यांचे कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मस्के बालासाहेब गोपाळराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, त्यांनी माहिती अर्जाद्वारे दि. ०९.०८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सर्वेक्षक या पदासाठी घेतलेल्या लेखी परीक्षेमधून एन.टी.सी. प्रवर्गातून पाच उमेदवार मौखिक परीक्षेसाठी पात्र ठरले होते. त्या उमेदवारांचे लेखी व व्यावसायिक परीक्षेच्या उत्तरपत्रिका व प्रश्नपत्रिकांच्या छायांकित प्रती व त्या पदासाठी निवड केलेल्या उमेदवाराच्या नियुक्तीपत्राची छायांकित प्रत -अशी माहिती मागितली आहे. त्यापैकी नियुक्तीपत्राची छायांकित प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांना ही माहिती प्राप्त झाली आहे. तपशीलही कळविण्यात आलेला आहे. तथापि कागदपत्रांच्या छायाप्रती देण्यात आलेल्या नाहीत. त्या देण्यात याव्यात.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांच्या दि. १४.१०.२००९ रोजीच्या माहिती अर्जावर कलम ७(१) नुसार विहित मुदतीत दि. ०६.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिलेला आहे व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती देता येणार नाहीत, असेही कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात सुनावणीमध्ये एन.टी.सी.प्रवर्गातील पाच उमेदवार मौखिक परीक्षेमध्ये पात्र ठरविले होते. त्यांची व इतर उमेदवारांच्या प्राप्त गुणांची माहिती पुरविण्यात आली आहे तथापि इतर माहिती त्रयस्थ व्यक्तींशी निगडीत असल्यामुळे अधिनियमातील कलम ८(घ) नुसार देण्यात आली नाही, ही बाब योग्य ठरत आहे. अपिलार्थी हे पाच उमेदवारांपैकी एक आहेत. त्यांनी पाच उमेदवारांच्या उत्तरपत्रिकेच्या छायाप्रती मागितल्या आहेत. अधिनियमातील कलम 8(1)(j) नुसार देय होणार नाहीत. तथापि अपिलार्थी यांची स्वतःची उत्तरपत्रिका,सर्वोच्च न्यायालयाच्या सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर या सिव्हिल अपील नं-६४५४/२०११ या प्रकरणात दि. ०९.०८.२०११ रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे देय होत आहे. उत्तरपत्रिकेच्या परीक्षकाचे नाव व पत्ता असल्यास तो अधिनियमातील कलम १० मधील तरतुदीनुसार वगळण्यात यावा व उत्तरपत्रिकेच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था करण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विभागीय वन अधिकारी (नि व मु) कार्यालय मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांची स्वतःची उत्तरपत्रिकेची प्रत अधिनियमातील कलम १० नुसार आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०४-२०१२**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मस्के बालासाहेब गोपाळराव,रा.केदारगुडा, पो.कवाना, ता.हदगाव,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विभागीय वन अधिकारी (नि व मु) कार्यालय मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नि व मु), कार्यालय मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पांडुरंग लक्ष्मणराव लोखंडे, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर
महानगरपालिका, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
आयुक्त, नांदेड वाघाळा शहर
महानगरपालिका, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19(8)(a) अन्वये आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून आयुक्त, नांदेड वाघाळा शहर,महानगरपालिका, नांदेड यांना निश्चित करण्यात येत आहे.त्यांनी अपिलार्थीच्या दि. २१.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. २१.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** | **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०४-२०१२** | **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पांडुरंग लक्ष्मणराव लोखंडे,रा. राजनगर, वाघाळा, हडको, नवीन नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,

नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | सौ. पंचफुलाबाई रामराव कन्नलवार, | : | अपिलार्थी |
| | रा. पो. कनकी, ता. किनवट, जि.नांदेड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | उपप्रबंधक, | | |
| | महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, औरंगाबाद | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | उपप्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, औरंगाबाद | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८३६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्री. सुरेश रामराव कन्नलवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या २३.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या जमिनीसंदर्भातील तहसील कार्यालयात असलेल्या प्रलंबित प्रकरणासंदर्भात काही माहिती मागितली आहे. त्यांना अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही. (त्यांची जमीन कुळाच्या ताब्यात आहे. त्रयस्थांच्या ताब्यातील जमिनीचा ताबा अपिलार्थी यांना घ्यावयाचा आहे.) जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रकरणात आयोगातर्फे पुढील तारीख दि. २०.०६.२०१२ दुपारी ०३.३० वा अशी निश्चित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या भूमिकेतून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19(8)(a) नुसार प्राप्त अधिकारानुसार पुढील सुनावणीस जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २०.०६.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. पंचफुलाबाई भ्र. रामराव कन्नलवार, रा. पो. कनकी, ता.किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपप्रबंधक,महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपप्रबंधक,महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महेंद्र सखाराम पिंपळगावकर,रा.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपआयुक्त, नांदेड वाघाळा शहर
महानगरपालिका, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक आयुक्त (आस्था), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड - श्री. संजय नारायणराव जाधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपआयुक्त(सा.प्र.वि.), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड - श्री. शशीमोहन गंगाधरराव नंदा | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. शिवाजी डहाळे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी  जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ श्री. डहाळे यांच्या उपस्टेडियम व्यवस्थापक या पदावरील नियुक्ती बाबतच्या तपशीलाची माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली आहे. श्री. डहाळे यांची उपस्टेडियम व्यवस्थापक अशा पदावर नियुक्ती करण्यात आली नाही. सध्या उपस्टेडियम व्यवस्थापक हे पद रिक्त आहे. श्री. डहाळे हे क्रिडा प्रशिक्षक आहेत. त्यामुळे अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती 'निरंक' आहे. ही माहिती अपिलार्थीस देणे योग्य ठरत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (आस्था), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महेंद्र सखाराम पिंपळगावकर,लेबर कॉलनी, पंचशिल शाळेच्या पाठीमागे, घर क्र. ३/२२, नांदेड - ४३१ ६०२.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (आस्था), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त(सा.प्र.वि.), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विनोद कल्याणराव देशमुख,नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय उपनिबंधक,<br>सहकारी संस्था,नाशिक विभाग,नाशिक | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,<br>नाशिक विभाग,नाशिक | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालय अधीक्षक, विभागीय उपनिबंधक,सहकारी संस्था,नाशिक विभाग,नाशिक | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,नाशिक विभाग,नाशिक | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री..एम.एस.भंडागे सहायक निबंधक,सहकारी संस्था, चांदवड, जि.नाशिक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.१०.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.१२.२००९<br>(मुंबई कार्यालयाकडे प्राप्त)<br>दि. ०२.०१.२०१० |

(औ.बाद कार्यालयाकडे प्राप्त)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे तीन मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"१) सहकार आयुक्त कार्यालयाने (पुणे) आपल्या कार्यालयास दिलेले पत्र दि. २३.०३.०५ व १९.०५.०५ (असल्यास सहपत्रकासह) च्या पत्राची साक्षांकित व छायांकित प्रत.

२) वरील पत्रास अनुसरुन आपल्या कार्यालयाने दिलेले उत्तरे सहपत्रकासह साक्षांकित व छायांकित प्रतीसह माहिती पुरवावी.

३) वि.स.नि.स.स.तर्फे जि.उ.नि.स.स.ला दिलेले पत्र व जि.ऊ.नि.स.स.तर्फे वि.स.नि.स. स. ला सादर केलेली माहिती सहपत्रकासह."

माहितीचा कालावधी सन २००५ ते २००९ असा आहे. माहिती अभिलेखात उपलब्ध नाही, म्हणून देता येत नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत दि. २२.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,नाशिक विभाग,नाशिक यांनी दि. ०८.१०.२००९ रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी अर्जाद्वारे मागितलेली माहिती अभिलेखात उपलब्ध नसल्याबद्दलची सद्यस्थिती जन माहिती अधिकारी यांनी कळविलेली आहे त्यामुळे अपील नामंजूर करण्यात येत आहे. तथापि राज्य माहिती आयोगास अपिलार्थी यांनी मागितलेल्या तीन मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही, ही बाब योग्य वाटत नाही. यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन संपूर्ण अभिलेखांची छाननी करण्यात यावी व केलेल्या कामकाजाच्या दैनंदिनीची नोंद ठेवण्यात यावी व अंतिम निर्णय अपिलार्थीस कळविण्यात यावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांनी वरील प्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन माहितीचा शोध घेऊन निष्कर्षासह अपिलार्थीस माहिती पाठविण्यात यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विनोद कल्याणराव देशमुख, द्वारा नांदेड हौसिंग सोसायटी नांदेड, ६० विजयनगर,नांदेड-२.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, विभागीय उपनिबंधक,सहकारी संस्था,नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बळीराम संभाजी भेन्डारे, रा. सेलू | : | अपिलार्थी |
| २ | श्री. संदीप हरिभाऊ पडलवार, रा. अमीनगुडा, पो. तुळशी, तालुका माहूर, जिल्हा नांदेड | : | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माहुर,<br>तालुका माहुर, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, माहुर, तालुका माहुर, जिल्हा नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२४०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माहुर,<br>तालुका माहुर, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, माहुर, तालुका माहुर, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०६-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०७-०९-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माहुर, जिल्हा नांदेड यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही असे नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये एकूण ११ मुद्दयांवर विविध माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. त्यापैकी कोणती माहिती देय होते ही बाब पहावी लागेल. त्याचप्रमाणे माहितीची व्याप्ती विचारात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) चा विचार करावा लागेल. तथापि यापूर्वी अपिलार्थीस त्यांची बाजू मांडण्यची संधी द्यावी लागेल.

या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8) (a) व 19 (7) मधील आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार आयोग अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करीत आहे. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे नव्याने सुनावणी घेण्यासाठी पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०६-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बळीराम संभाजी भेन्डारे, रा. सेलू, पो. करंजी, तालुका माहूर, जिल्हा नांदेड.

२. श्री. संदीप हरिभाऊ पडलवार, रा. अमीनगुडा, पो. तुळशी, तालुका माहूर, जिल्हा नांदेड

३. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माहुर, तालुका माहुर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अमृत नरंगलकर,<br>व्दारा, एन. डी. ४२, जे. ३, घर नंबर ५३/८, वैभवनगर,<br>हडको, नवीन नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२४०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम<br>उपविभाग, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड<br>- श्री. संजय सोपानराव पाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड<br>- श्री. विवेक चंद्रकांत नवले | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०७-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती निरंक असल्याकारणाने त्याबाबत विहित मुदतीत दिनांक २२-०६-२००९ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक २५-०८-२००९ रोजी निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास अपेक्षित असलेली माहिती १५ दिवसांच्या आत विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर पुन्हा तपासणी करुन अपिलार्थीस दिनांक ०१-०९-२००९ रोजी माहितीबाबत कळविण्यात आले आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालील-प्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अमृत नरंगलकर, व्दारा, एन. डी. ४२, जे. ३, घर नंबर ५३/८, वैभवनगर, हडको, नवीन नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. टेकाळे शेषेराव एकनाथ, : अपिलार्थी
रा. पो. कुपटी (मा.), तालुका माहुर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२४०४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०१-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०७-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8) (a) व 19 (7) मधील आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार आयोग अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करीत आहे. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे नव्याने सुनावणी घेण्यासाठी पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, त्यांना माहिती दिली किंवा कसे इत्यादीबाबतचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारीत करावा.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. टेकाळे शेषेराव एकनाथ, रा. पो. कुपटी (मा.), तालुका माहुर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लक्ष्मण नागोराव येताळे पाटील, : अपिलार्थी
बाभळीकर निवास, देशमुख गल्ली, भोकर, तालुका भोकर,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर,
जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर,
तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड

१ अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२४०५

२ सुनावणीची तारीख दि. १८-०४-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी, : अनुपस्थित
तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर,
जिल्हा नांदेड

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर,
तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड

३.४ त्रयस्थ - श्री. संतोष शिंदे : अनुपस्थित

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. १४-०७-२००९

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. याकरिता या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8) (a) व 19 (7) मधील आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार आयोग अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करीत आहे. प्रकरण त्यांच्याकडे नव्याने सुनावणी घेण्यासाठी पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारीत करावा.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०४-२०१२**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण नागोराव येताळे पाटील, बाभळीकर निवास, देशमुख गल्ली, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. स. वजीर स. अहमद, : अपिलार्थी
बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी
कार्यालय, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२४०६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी<br>- श्री. व्हि. डी. कुरुंदकर, नायब तहसीलदार, मुदखेड | : उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०३-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२-०७-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०७-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मौजे धनज, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड या गावातील शेतक-यांचे ऑगस्ट २००६ मध्ये अतिवृष्टी / महापुरामुळे नुकसान झालेल्या खोटे व बोगस रेकार्ड तयार करुन शासनाची लाखो रुपयाची फसवणूक केल्याबाबतच्या दिलेल्या तक्रार अर्जावर झालेल्या चौकशी अहवालाची मागणी केली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थीच्या माहिती अर्जावर केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. ही बाब विचारात घेता या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8) (a) व 19 (7) मधील आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार आयोग अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करीत आहे. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे नव्याने सुनावणी घेण्यासाठी पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०६-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स. वजीर स. अहमद, बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, : अपिलार्थी
रहेमान मंजील, घर क्रमांक ९-६-२२०, उमर कॉलनी,
मस्जीद समोर, देगलूर रोड, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२४०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>परभणी - श्री. डी. बी. चिद्रेवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी<br>- श्री. जी. एस. खाडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४-०४-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०६-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये नमूद केले आहे की, त्यांना माहिती मिळाली आहे तथापि अर्धवट व उशिराने मिळाली आहे व त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आलेली नाही. तसेच आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ०६-०४-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०४-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, रहेमान मंजील, घर क्रमांक ९-६-२२०, उमर कॉलनी, मस्जीद समोर, देगलूर रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, मु. होंडाळा, पो. दापका (राजा), तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड, पुणे - ०१ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड, पुणे - ०१ | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२४०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, (अपंग संस्था), अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड, पुणे - ०१ - श्री. एम. डी. काटवटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड, पुणे - ०१ - श्रीमती विजया पवार | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०१-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०१-०१-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २६-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-०१-२००९ पुणे खंडपीठाकडे प्राप्त दिनांक<br>२३-०३-२०१० औरंगाबाद खंडपीठाकडे प्राप्त |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये पुणे, नांदेड, लातूर, बीड, परभणी, हिंगोली, जालना, उस्मानाबाद व औरंगाबाद या जिल्ह्यातील दिनांक १८-०८-२००४ च्या आकृतीबंधानुसार किती जागा उपलब्ध आहेत, पदोन्नती देण्याबाबतची माहिती व अतिरिक्त कर्मचा-यांचे समायोजन इत्यादी विषयावर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी ०१ जून २००० ते ०१ जून २००८ असा आठ वर्षाचा आहे. माहिती संकलीत करण्यासाठी काही कालावधी लागला. अपिलार्थीस दिनांक २४-०३-२००९ रोजी व त्यानंतर दिनांक ०४-०४-२००९ रोजी माहिती पाठविण्यात आली आहे. अपिलार्थीची दिनांक १०-०४-२००९ रोजीची माहिती मिळाल्याबाबतची पोच त्यांच्या दप्तरी दाखल असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती पाहता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात असलेल्या माहितीची पाहणी अपिलार्थीस देणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत होते. तथापि अपिलार्थी यांनी माहिती पाठविण्याची विनंती केली असल्यामुळे त्यांना माहिती पाठविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीतील काही माहिती इतर कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आहे. यासंदर्भात अपिलार्थीस संबंधित कार्यालयाच्या जन माहिती अधिका-याकडे अर्ज करण्यास कळविण्यात आले आहे. जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे ती अपिलार्थीस दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेली माहिती पाहता बहुतांश माहिती अपिलार्थीस पाठविल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीस अजूनही काही माहितीची आवश्यकता असल्यास त्यांनी नव्याने अर्ज करावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १८-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, मु. होंडाळा, पो. दापका (राजा), तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, (अपंग संस्था), अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती वंदना सदाशिव बायस, : अपिलार्थी
मु. इंदेवाडी पो. पोकर्णी (नृ), ता. जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पोलीस उपअधीक्षक, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस अधीक्षक, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२७१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १८-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे मदतनीस- श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - पोलीस उपअधीक्षक, परभणी -श्री. संदीप डोईफोडे | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६.०८.२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०९.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.११.२०११ |

या पूर्वी या प्रकरणाची सुनावणी दि. ०१.०२.२०१२ व तदनंतर दि. ०६.०३.२०१२ रोजी घेण्यात आली होती. दि. ०१.०२.२०१२ रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे मदतनीस उपस्थित होते. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यांची बाजू ऐकून घेणे

आयोगास आवश्यक वाटल्यामुळे दि. ०६.०३.२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. तथापि त्यावेळी देखील जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यामुळे आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख दि. १८.०४.२०१२ अशी निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार आज सुनावणी घेण्यात येत आहे. आज सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांचे मदतनीस उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी ज्यावेळी माहिती मागितली होती, त्यावेळी चौकशीची कार्यवाही सुरु होती. त्यामुळे देण्यात आली नाही. आता यासंदर्भात गुन्हा दाखल झालेला आहे. आज रोजी कागदपत्रे उपलब्ध आहेत. जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहे.

या सर्व बाबींचा विचार करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती सात दिवसांच्या आत अपिलार्थी प्रत्यक्ष त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाल्यास विनामूल्य देण्यात यावी अथवा नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्यात यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, परभणी यांनी वरीलप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच सात दिवसांच्या आत अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाल्यास विनामूल्य द्यावी अथवा नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती वंदना सदासिव बायस, मु.इंदेवाडी, पो. पोकर्णी(नृ), ता.जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नागेशशास्त्री विठ्ठलशास्त्री नंदीबुवा अंबुलगे, : अपिलार्थी
रा. तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक व्यवस्थापक (प्रशासन), श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, , तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०६३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नागेशशास्त्री विठ्ठलशास्त्री नंदीबुवा अंबुलगे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक व्यवस्थापक (प्रशासन), श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद<br>- श्री. नाईकवाडी दिलीप देविदासराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार तथा सरव्यवस्थापक, तहसील कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४-१२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४-०१-२०११ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५-०१-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-०३-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १४-०३-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दिनांक २४-१२-२०१० रोजी प्रतिसाद दिलेला आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात त्यांना माहिती मिळाल्याचे मान्य केले, तथापि मिळालेल्या माहितीच्या संदर्भात त्यांचे काही मतभेद असल्याचे दिसून येत आहे. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीत बसत नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता प्रकरण या टप्प्यावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १९-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नागेशशास्त्री विठ्ठलशास्त्री नंदीबुवा अंबुलगे, रा. तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक व्यवस्थापक (प्रशासन), श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार तथा सरव्यवस्थापक, तहसील कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. व्यंकटराव लक्ष्मणराव भंडारवार, : अपिलार्थी
मु. पो. रामनगर, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर,जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. ०३.१०.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १९-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नुर अली स.बाखर अली, रा.कुबा कॉलनी, अर्धापूर,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (पुरवठा), तहसील कार्यालय,अर्धापूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. खदीर म.खाजा शेख,<br>रा. अर्धापूर, ता. अर्धापूर , जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>अर्धापूर , जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, अर्धापूर, जि.नांदेड | : | |
| | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. खदीर म.खाजा शेख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकून (पुरवठा),तहसील कार्यालय, अर्धापूर, जि.नांदेड - श्री. देसाई जि.एन. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, अर्धापूर, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. ही बाब आयोगास गंभीर वाटते. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19(8)(a) अन्वये आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून तहसीलदार, अर्धापूर,जि.नांदेड यांना निश्चित करण्यात येत आहे.त्यांनी अपिलार्थीच्या दि. ३०.११.२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर,जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. ३०.११.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १९-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. खदीर म.खाजा शेख (नांदेड जिल्हा उपाध्यक्ष) अखिल भारतीय भारत निर्माण सेना,राअर्धापुर, ता.अर्धापुर,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (पुरवठा),तहसील कार्यालय, अर्धापूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अविनाश लालबा क्षिरसागर,<br>रा. अर्धापूर, जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>अर्धापूर, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, अर्धापूर, जि.नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकून (पुरवठा),तहसील कार्यालय,अर्धापूर, जि.नांदेड - श्री. देसाई जि.एन. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, अर्धापूर, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०७.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19(8)(a) अन्वये आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून तहसीलदार, अर्धापूर,जि.नांदेड यांना निश्चित करण्यात येत आहे.त्यांनी अपिलार्थीच्या दि. २५.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर,जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. २५.०२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अविनाश लालबा क्षिरसागर,द्वारा मे.धनंजय कृषि सेवा केंद्र, तामसा रोड,अर्धापूर, ता.अर्धापूर,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (पुरवठा),तहसील कार्यालय,अर्धापूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अर्धापूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. वडजे माधवराव रामराव,<br>रा. खंडगाव (हा.), पो. बोमनाळी, ता.कंधार,जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय,नायगाव (खै), जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, नायगाव(खै),जि.नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय,नायगाव (खै), जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.<br>एस.जी.पाटील,लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,<br>नायगाव(खै),जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. २१.१२.२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये मौजे आलू वडगाव,ता.नायगाव (खै) येथील वस्तीवाढ बदलासंदर्भात विस्तृत अशी माहिती मागितली आहे. सर्व माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला व अपिलार्थी यांच्या माहितीच्या मूळ अर्जातील उपलब्ध माहिती अपिलार्थीस दि. ०३.०३.२०१० रोजी पाठविण्यात आली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत.यास्तव अपिलार्थीस पुन्हा एकदा माहितीचा एक संच नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्यात यावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,नायगाव (खै), जि.नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहितीचा एक संच अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १९-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वडजे माधवराव रामराव,रा. खंडगाव (हा.), पो. बोमनाळी, ता.कंधार,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,नायगाव (खै), जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,नायगाव(खै),जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. श्रीकांत अंबादास महाजन,<br>घर नंबर ७/७२७, कुलश्री, नगरपरिषद शाळेसमोर,<br>समतानगर, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कर आकारणी बांधकाम परवाना विभाग, विभाग प्रमुख,<br>नगर परिषद, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कर आकारणी बांधकाम परवाना विभाग, विभाग प्रमुख,<br>नगर परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०२-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६-०५-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १३-०३-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद यांनी दिनांक १६-०५-२०११ रोजी अपिलार्थीस विनामूल्य माहिती द्यावी असा निर्णय दिला आहे. अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाली नाही असे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीकांत अंबादास महाजन, घर नंबर ७/७२७, कुलश्री, नगरपरिषद शाळेसमोर, समतानगर, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, कर आकारणी बांधकाम परवाना विभाग, नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, : अपिलार्थी

रा. घर नंबर ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

कक्ष अधिकारी, संचालनालय वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय बिल्डींग, सेंट जॉर्जस हॉस्पिटल कंपाऊंड,

मुंबई - ४०० ००१

जन अपिलीय अधिकारी तथा :

संचालनालय वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय बिल्डींग, सेंट जॉर्जस हॉस्पिटल कंपाऊंड,

मुंबई - ४०० ००१

१ अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२४०९

२ सुनावणीची तारीख दि. १९-०४-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : अनुपस्थित

प्रशासकीय अधिकारी, संचालनालय वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय बिल्डींग, सेंट जॉर्जस हॉस्पिटल कंपाऊंड,

मुंबई - ४०० ००१

३.३ जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. संजय रा. वाघमारे, कार्यालयीन अधीक्षक : उपस्थित

| | | | |
|---|---|---|---|
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य प्रशासकीय अधिकारी, संचालनालय वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय बिल्डींग, सेंट जॉर्जस हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई - ४०० ००१ | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. संजय इ. मगर, प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.६ | त्रयस्थ डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड | : | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०३-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांची सेवाविषयक माहिती त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती संबंधित डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांच्याकडे उपलब्ध असल्यामुळे त्या महाविद्यालयाकडे दिनांक १७-०७-२००९ रोजी अपिलार्थीचा माहितीचा अर्ज पाठविण्यात आला व त्याप्रमाणे अपिलार्थीस कळविण्यात आले. त्यानंतर अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांच्याकडे प्रथम अपील केले. ते अपील सुध्दा दिनांक १८-०८-२००९ रोजी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांच्याकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे. त्यांनी पुढे असेही कथन केले की, अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांच्याकडून माहिती देण्यात आली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगस पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थी यांनी ह्याच माहितीबाबत दिनांक २३-०६-२००९ रोजी मुख्य प्रशासकीय अधिकारी, डॉ. शंकरराव

चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांच्याकडे माहितीचा अर्ज केला होता व या माहिती अर्जासंदर्भातील व्दितीय अपिलावर दिनांक ३१-१२-२०१० रोजी आयोगासमोर सुनावणी होऊन अपिलार्थीस माहिती मिळाली असल्याने अपील निकाली काढण्यात आले आहे. आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता आज रोजी विचाराधीन असलेल्या अपिलावर नव्याने सुनावणी घेण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल महंमद कासीम, रा. घर नंबर ९-४-१०६१, रामरहिमनगर, पोस्ट ईतवारा, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, संचालनालय वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय बिल्डींग, सेंट जॉर्जस हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, संचालनालय वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय बिल्डींग, सेंट जॉर्जस हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पुरभाजी हनमंतराव शिंदे, : अपिलार्थी
रा. लोणखुर्द, ता. अर्धापूर, जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, मुदखेड,जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय,मुदखेड, जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२४१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १९-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार(म.), तहसील कार्यालय, मुदखेड,जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, मुदखेड, जि.नांदेड- श्री. किरण अंबेकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी त्यांच्या मूळ अर्जान्वये राज्य माहिती आयोग यांनी दि. १०.०२.२००९ रोजी श्री. पुरभाजी हनमंतराव शिंदे विरुध्द जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, मुदखेड या प्रकरणामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगाची कार्यवाही करावी, या दिलेल्या आदेशावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागत आहेत. अपिलार्थी यांनी अर्ज सादर केला त्यावेळी कार्यवाही प्रगतीपथावर होती. ती आता पूर्ण झाली आहे व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

वरील बाबी अपिलार्थीस कळविण्यात याव्यात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.), तहसील कार्यालय,मुदखेड, जि.नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे सद्यस्थितीबाबतची माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १९-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पुरभाजी हनमंतराव शिंदे,रा. लोणखुर्द, ता. अर्धापुर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.), तहसील कार्यालय,मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उध्दव बाबासाहेब मिसाळ, : अपिलार्थी
रा. व्दारा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालय,
जालना रोड, बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, शिरुर (कासार),
तालुका शिरुर (कासार), जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक भूमि अभिलेख, बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६१९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. उध्दव बाबासाहेब मिसाळ | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक भूमि अभिलेख, शिरुर (कासार),<br>तालुका शिरुर (कासार), जिल्हा बीड<br>- श्री. आर. डी. कपोते | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड | : अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. डी. बी. पोतदार, वरिष्ठ लिपीक | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०-०३-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २५-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९-०५-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०६-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २१-०३-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटल्याने सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांना माहिती प्राप्त झाली आहे तथापि या माहितीमध्ये त्यांना प्राप्त झालेली नकाशाची सलग एकच प्रत प्राप्त न होता तुकड्यांमध्ये नकाशाची प्रत मिळाली आहे त्यामुळे त्याचा बोध होत नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने मागितलेली मूळ कागदपत्रे सन १९३० सालापासूनची आहेत व ती जीर्ण अवस्थेत आहेत. ज्या स्थितीत माहिती उपलब्ध आहे त्या स्थितीत ती अपिलार्थी यांना देण्यात आली आहे असे दिसून येत आहे. अपिलार्थी यांना त्यांच्या जमिनीवर झालेल्या अतिक्रमणाबाबत माहिती आवश्यक आहे असे दिसून येत आहे. उपलब्ध झालेल्या माहितीवरुन अपिलार्थी यांनी जमिनीच्या मोजणीकरिता संबंधित विभागाकडे अर्ज करणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा अर्ज विहित शुल्कासह प्राप्त होताच नियमानुसार योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल, असे आयोगास कथन केले.

वरील सर्व बाबी विचारात घेता प्रकरण या टप्प्यावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०४-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उध्दव बाबासाहेब मिसाळ, रा. व्दारा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालय, जालना रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक भूमि अभिलेख, शिरुर (कासार), तालुका शिरुर (कासार), जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पठाण रहेमतउल्ला समीउल्ला, : अपिलार्थी
पांडुरंग ऑईल मिल समोर, गोकुंदा, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,
मुंबई - ३२

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,
मुंबई - ३२

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८५७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,<br>मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. वा. ना. देशपांडे, प्रशासकीय अधिकारी, तंत्रशिक्षण, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,<br>मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | प्रतीवर दिनांक नाही |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०८-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २०-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १०-०४-२०१२ च्या पत्रान्वये सध्या राज्य विधानमंडाचे अर्थसंकल्पिय अधिवेशन सुरु असल्यामुळे ते सुनावणीस उपस्थित राहू शकत नसल्याने त्यांची अनुपस्थिती ग्राह्य धरण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी गुणवत्ता नि साधन आधारीत शिष्यवृत्ती योजनेबाबतची माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००८-०९ असा दिलेला आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपिलार्थी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत दिनांक ०८-०२-२०१० रोजी शासन परिपत्रकाची प्रत पाठविण्यात आली आहे असे दिसून येत आहे. तथापि या विषया-संबंधात सन २००८-०९ नंतर आजपर्यंत काही सुधारीत निर्णय, परिपत्रके झाली असल्यास त्याच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य एका महिन्याच्या आत पाठविण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांनी करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पठाण रहेमतउल्ला समीउल्ला, पांडुरंग ऑईल मिल समोर, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड - ४३१ ८११.

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पुपलवाड भागवत आत्माराम, : अपिलार्थी
मु. पो. पाटोदा (तब), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
अतिरिक्त पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,
नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८५८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, बिलोली,<br>तालुका बिलोली, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,<br>नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३-११-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०८-०१-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १८-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १४-१०-२००९ च्या माहिती अर्जान्वये मौजे पाटोदा (तब), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड येथील एका प्रकरणाबाबत चौकशीच्या संदर्भात माहिती मागितलेली आहे. सदरच्या माहितीची सद्यस्थिती दिनांक १३-११-२००९ च्या पत्रान्वये विहित मुदतीत अपिलार्थीस कळविण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड यांनी सुनावणी घेऊन दिनांक ०८-०१-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या अर्जाबाबतचे प्रकरण महसूल आयुक्त औरंगाबाद, जिल्हा परिषद, नांदेड आणि पंचायत समिती, नायगाव यांच्याशी संबंधित असून या विभागाकडून चौकशी चालू असून तीन ग्रामसेवकांना निलंबीत केल्याचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून माहिती समजली आहे व महसूल विभागाकडे चालू असलेल्या चौकशीअंती त्यांच्या सक्षम अधिका-यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद दिल्यानंतर रितसर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आले आहे. या सर्व बाबी कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. यावरुन अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पुपलवाड भागवत आत्माराम, मु. पो. पाटोदा (तब), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | सौ. सतनाम कौर भ्र. स. संपूर्ण सिंघगील, | : | अपिलार्थी |
| | अध्यक्षा, माता भागोजी सचखंड अल्पसंख्यांक सेवाभावी संस्था, अबिचल नगर, गोविंद बाग, सेक्टर नं. ६/५, भगत सिंघ रोड, हजुर साहिब, नांदेड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| | गुरुव्दारा सचखंड बोर्ड, नांदेड | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | अधीक्षक, गुरुव्दारा सचखंड बोर्ड, नांदेड | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वरिष्ठ सहायक अधीक्षक, गुरुव्दारा सचखंड, नांदेड<br>- श्री. संतसिंघ लालसिंघ संधु | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे वकील - श्री. जे. जे. सुखमणी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक, गुरुव्दारा सचखंड, नांदेड<br>- श्री. स. देवेंद्रपालसिंघ पि रणजीतसिंघ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | निरंक |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०४-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०४-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व त्यांचे वकील आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या वकिलाने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २४-०३-२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार दिनांक १२-०४-२०१० रोजी विहित मुदतीत दिलेली आहे. कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहेत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. सतनाम कौर भ्र. स. संपूर्ण सिंघगील, अध्यक्षा, माता भागोजी सचखंड अल्प-संख्यांक सेवाभावी संस्था, अबिचल नगर, गोविंद बाग, सेक्टर नं. ६/५, भगत सिंघ रोड, हजुर साहिब, नांदेड - ४३१ ६०१.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सहायक अधीक्षक, गुरुव्दारा सचखंड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, गुरुव्दारा सचखंड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बैजू रतनशहा जिल्ला, : अपिलार्थी
नांदेड वाईन मार्ट, लोटीया कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कार्यालय विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद
विभाग, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बैजू रतनशहा जिल्ला | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,<br>औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद<br>विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८-०३-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २१-०४-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक १५-०६-२०१२ रोजी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बैजू रतनशहा जिल्ला, नांदेड वाईन मार्ट, लोटीया कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विलास दिगंबरराव शिंदे (पाटील),<br>ता. चिटणीस, भा. ज. पा., भोकर,<br>मु. पो. भोसी, तालुका भोकर, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>पशुसंवर्धन विस्तार अधिकारी, भोकर, तालुका भोकर,<br>जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>पशुधन विकास अधिकारी (वि), पंचायत समिती, भोकर,<br>तालुका भोकर, जिल्हा नांदेड - डॉ. गिरी एस. पी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - डॉ. लोणे ए. बी.,<br>पशुधन विकास अधिकारी (ता.), जिल्हा परिषद, नांदेड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०४-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १३-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०८-०४-२०१० च्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होते ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत अपिलार्थीस त्यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर दिली आहे व अपिलार्थी यांनी त्याची पोच दिली आहे. या बाबी कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विलास दिगंबरराव शिंदे (पाटील), ता. चिटणीस, भा. ज. पा., भोकर, मु. पो. भोसी, तालुका भोकर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा पशुधन विकास अधिकारी (वि), पंचायत समिती, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | सौ. रुक्साना बेगम,<br>घर नंबर ९/७/१०२४, मोहम्मदीया कॉलनी, मालटेकडी रोड, नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती - श्री. वा. पां. जाधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती | : | अनुपस्थित |
| ३.४ | सध्याचे जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. प्रदिप इंदुरकर, सहायक अधीक्षक अभियंता | : | उपस्थित |
| ३.५ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. डी. आर. ठाकूर | : | उपस्थित |
| ३.६ | त्रयस्थ श्री. मदन भुंबर, अनुरेखक | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५-११-२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १९-११-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ०७-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २६-०४-२०१० राज्य माहिती आयोग अमरावतीकडे प्राप्त दि. १८-०५-२०१० राज्य माहिती आयोग औरंगाबादकडे प्राप्त |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाचे कर्मचारी उपस्थित आहेत. अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०५-११-२००९ च्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ श्री. मदन भुंबर, अनुरेखक यांची सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे केलेल्या वेतन निश्चितीची प्रत व ग्रेड पे सुधारित आदेशाची छायांकीत सत्यप्रत इत्यादी माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी या माहिती अर्जाच्या संदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत दिनांक १९ नोव्हेंबर २००९ रोजी प्रथम प्रतिसाद दिलेला आहे व वेतन निश्चिती करण्याचे प्रगतीपथावर असल्याने निश्चिती झाल्यावर माहिती देण्यात येईल असेही कळविले आहे. त्यानंतर अपिलार्थी यांना दिनांक १९-०४-२०१२ रोजी नोंदणीकृत टपालाव्दारे माहिती पाठविण्यात आली आहे. आयोगापुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २०-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. रुक्साना बेगम, घर नंबर ९/७/१०२४, मोहम्मदीया कॉलनी, मालटेकडी रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कदम भाऊसाहेब सदाशिव, : अपिलार्थी
मु. शिरसी (खु.), पो. गोणार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार,
जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिरसी (खु.), पो. गोणार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड - श्री. वादे एम. बी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०४-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १०-१२-२००९ रोजीचा माहितीचा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार यांच्याकडे दिनांक १७-०६-२०१० रोजीच्या जोडपत्रासह सादर केलेला आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार यांनी सदरचा अर्ज ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिरसी (खु.), तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांच्याकडे वर्ग केल्यानंतर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत दिनांक १७-०७-२०१० रोजी अपिलार्थीस माहितीकरिता रुपये ५०० चा भरणा करावा असे कळविले आहे. अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नाहीत. त्यामुळे त्यांना कळविलेल्या शुल्काचा त्यांनी भरणा केलेला नाही म्हणून माहिती देता आली नाही. अपिलार्थीने या शुल्काचा भरणा केल्यास त्यांना माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कदम भाऊसाहेब सदाशिव, मु. शिरसी (खु.), पो. गोणार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिरसी (खु.), पो. गोणार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तालुका कंधार,

जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गुमलवाड गोविंद नागोराव, : अपिलार्थी
रा. कळंगाव, पो. कार्ला, तालुका उमरी, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कळंगाव,
तालुका उमरी, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कळंगाव, तालुका उमरी, जिल्हा नांदेड - श्री. पुपूलवाड संजय लिंगराम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. शेख म. लतीफ, विस्तार अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ श्री. गुमलवाड नागोराव महादु | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०८-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १६-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कळंगाव, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी नव्यानेच कार्यभार घेतला आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना अपिलार्थीस देण्याकरिता काही कालावधी मिळावा.

जन माहिती अधिकारी यांची ही विनंती मान्य करण्यात येते. यास्तव सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक १४-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गुमलवाड गोविंद नागोराव, रा. कळंगाव, पो. कार्ला, तालुका उमरी, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कळंगाव, तालुका

उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महंमद खलीलोद्दीन महमद जैनौद्दीन, : अपिलार्थी
रा. नुरेइलाही मस्जीद जवळ, रहेमतनगर, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापिका, मदिनातुल उलुम (मुलींचे), प्राथमिक शाळा, मंढई, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८६५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. महंमद खलीलोद्दीन महमद जैनौद्दीन | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, मदिनातुल उलुम (मुलींचे), प्राथमिक शाळा, मंढई, नांदेड<br>- श्रीमती शहनाझ सुलताना पि. मो. मुस्तफा खान | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ - १. श्री. तोहीद खान | : उपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ - २. श्री. शेख युनूस शे. महेबुब | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०४-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २१-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व संबंधित त्रयस्थ उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ०३-०४-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०४-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महंमद खलीलोद्दीन महमद जैनौद्दीन, रा. नुरेइलाही मस्जीद जवळ, रहेमतनगर, नांदेड - ४३१ ६०४

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मदिनातुल उलुम (मुलींचे), प्राथमिक शाळा, मंढई, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कंधारे बाबाराव परशराम, : अपिलार्थी

मु. पो. वाई (बाजार), तालुका माहूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वाई (बाजार), तालुका माहूर, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर,

तालुका माहूर, जिल्हा नांदेड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८६६

२ सुनावणीची तारीख दि. २०-०४-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वाई (बाजार), तालुका माहूर, जिल्हा नांदेड

- श्री. विजय विठ्ठलराव दांडेकर

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर,

तालुका माहूर, जिल्हा नांदेड - श्री. व्ही. यु. सुरोसे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०८-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी वाई (बाजार), तालुका माहूर, जिल्हा नांदेड येथील ग्रामपंचायतसंदर्भात विविध मुद्दयांवर विस्तृत अशी माहिती दिनांक ०८-०१-२०१० च्या माहिती अर्जान्वये मागितलेली आहे. माहिती अर्जाच्या संदर्भात माहिती पुरविण्याकरिता एकंदर रुपये ३१८ इतक्या शुल्काचा भरणा करावा असे दिनांक १७-०२-२०१० रोजी अपिलार्थीस कळविले आहे. त्यानुसार अपिलार्थी यांनी या शुल्काचा भरणा त्याच दिवशी केला व दिनांक १७-०२-२०१० रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती दिलेली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर यांच्याकडे दिनांक ०५-०३-२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले होते. परंतु या अपिलावर त्यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतलेली नाही व निर्णय दिलेला नाही. ही बाब विचारात घेता अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात तसेच दिलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपिलावर सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>**आदेश**</u>

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कंधारे बाबाराव परशराम, मु. पो. वाई (बाजार), तालुका माहूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वाई (बाजार), तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद जहिर हारुण, : अपिलार्थी
रा.माहुर, ता.माहुर,जि. नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ, पानचक्की,
औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८६७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०१.०४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते.

यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19(8)(a) अन्वये आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना निश्चित करण्यात येत आहे.त्यांनी अपिलार्थीच्या दि. १८.११.२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. १८.११.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद जहिर हारुण, एस.बी.आय.बँकेच्या मागे, मु.पो.माहूर, ता. माहूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,

पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गव्हाणे चंद्रकांत पिराजी,रा. नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता (यांत्रिकी विभाग),
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपआयुक्त (प्रशासन),
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअभियंता (यांत्रिकी विभाग), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड -श्री. राजकुमार नामदेवराव वानखेडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपआयुक्त (प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (यांत्रिकी) यांनी आयोगासमोर कथन केले की,

१) श्री. चंद्रकांत पिराजी गव्हाणे, अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये यांत्रिकी विभागांतर्गतची वाहन व सयंत्र दुरुस्ती व देखभालीसाठी किती खर्च करण्यात आला तसेच बंद असलेल्या वाहनांची माहिती, मागील वर्षात वाहननिहाय संपूर्ण खर्चाची माहिती, वाहने कोणत्या कारणाने बंद होते. वाहन चालकांचा अहवाल इ. च्या छायांकित प्रतींची मागणी केली होती.

२) संबंधितास माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दि. २२.०२.२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचेकडे दाखल केले.

३) संबंधिताना कार्यालयीन पत्र क्र. नावाशमनपा/यांत्रिकी वि/५४१/१० दि. २२.०३.२०१० रोजी म्हणजे सुनावणीच्या नंतर लगेचच दोन दिवसांत आवश्यक ती माहिती पोस्टाने पाठविण्यात आली.

४) अपिलार्थी यांना पोस्टाने माहिती वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले.

५) अपिलार्थी यांना त्यांचे घरी प्रत्यक्ष भेटून दि. ०४.०५.२०१० रोजी आवश्यक त्या माहितीच्या प्रती देण्यात आल्या.

६) माहिती मिळाल्याचे अपिलार्थीनी या कार्यालयास लेखी कळविल्यामुळे ते प्रकरण बंद करण्यात आले आहे. अपिलार्थींच्या लेखी पत्राची सोबत सादर करण्यात येत आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहे.

अपिलार्थी यांचे उपअभियंता (यांत्रिकी विभाग), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना दि. ०४.०५.२०१० रोजी लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, त्यांना संपूर्ण माहिती मिळाली आहे. प्रकरण निकाली काढण्यात यावे.

या सर्व बाबी विचारात घेता प्रकरण निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गव्हाणे चंद्रकांत पिराजी, साप्ताहिक 'विधायकता', फायर स्टेशनच्या पाठीमागे, गणेशनगर रोड, नांदेड-४३१ ६०२

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (यांत्रिकी विभाग),नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन),नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मो. मोईज खान पठाण,रा. नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक प्रकल्प अधिकारी,<br>सु.ज.श.रो.यो.नांदेड वाघाळा शहर<br>महानगरपालिका, नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सामान्य),<br>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक प्रकल्प अधिकारी,<br>सु.ज.श.रो.यो.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड<br>- श्री. एन.जी.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | प्रकल्प संचालक, सु.ज.श.रो.यो.नांदेड वाघाळा शहर<br>महानगरपालिका, नांदेड - श्री. ए.एम.सुर्यवंशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपआयुक्त (सामान्य),<br>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०.०३.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०४.०५.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रकल्प संचालक, सु.ज.श.रो.यो.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

१) सन २००६ ते अद्ययावत मनपातर्फे स्थापित बचत गटांची सविस्तर माहिती.

२) फिरता निधी देण्यात आलेल्या बचतगटाची कार्यकारिणीसह रकमेची सविस्तर माहिती.

३) बचत गटांना बँकेमार्फत दिलेल्या कर्जाची, बचतगटांची व बँकेची सविस्तर माहिती.

४) जानेवारी, २००६ ते डिसेंबर पर्यंत बँकेस पाठविलेल्या कर्जप्रस्तावांची माहिती.

५) मंजूर कर्ज मिळालेल्या लाभार्थ्यांची तपशिलवार माहिती कर्ज वाटप, दिनांक,प्रस्ताव,व्यवसाय तसेच बँकेच्या नावासह रकमेची सविस्तर माहिती.

६) सन २००७ ते २००९ पर्यंत शिलाई मशिन वाटप केलेल्या लाभार्थ्यांची यादी व इतर संबंधित कागदपत्रांची सत्यप्रत.

७) केंद्र व राज्य शासनाच्या अद्ययावत सर्व योजनांची आवश्यक कागदपत्रांचे नियम व निर्देशांची सत्यप्रत.

८) कार्यरत वर्ग १ ते ४ कर्मचाऱ्यांची कर्तव्य अधिकार कार्यपध्दत, नाव पदनामासह सविस्तर माहिती

अपिलाथी यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून संपूर्ण माहिती संकलीत करुन दि. ०४.०५.२०१० रोजी दिलेली आहे. अपिलार्थी यांनी स्वीकारली आहे व त्यासंदर्भातील पोच दि. ०५.०५.२०१० रोजी दिलेली आहे.

आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मो.मोईजखान पठाण, द्वारा राम संगनवार, ओम निवास, प्रतिभा निकेतन शाळेजवळ, कैलासनगर,नांदेड-४३१ ६०५.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी,सु.ज.श.रो.यो.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य),नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख अफसर शेख बाबु, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक आयुक्त,
आस्थापना विभाग,नांदेड वाघाळा शहर,
महानगरपालिका,नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपआयुक्त (प्रशासन),
नांदेड वाघाळा शहर,
महानगपालिका,नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक आयुक्त, आस्थापना विभाग,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड - श्री. संजय जाधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपआयुक्त (प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगपालिका,नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ -श्री. नरवाडे, श्री. अंधारे,श्री. बाशेष्टी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०२.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या तीन त्रयस्थ अभियंत्यांच्या संदर्भात एकूण चार मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यातील मुद्दा क्र. १ व ४ ची माहिती शैक्षणिक अर्हतेबाबत तसेच नियुक्तीबाबत आहे. सदरची माहिती दि. ०७.०४.२०१२ रोजी एकूण ३४ पृष्ठे अपिलार्थीस देण्यात आली आहेत. अपिलार्थी यांनी स्वीकृत केलेली आहे. मुद्दा क्र. २ ची माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे देता येत नाही, असेही कळविलेले आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होत आहे व जी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे ती देण्यात आली आहे, असे आयोगास दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मुद्दा क्र. २ व ३ द्वारे तीन त्रयस्थच्या नियुक्तीच्या वेळी जाहीर केलेल्या मत्ता व दायित्त्वाच्या प्रती तसेच त्यांच्या रक्ताच्या कुटुंबियांची नावे व जंगम मालमत्तेविषयीची माहिती मागितली आहे. सदरची माहिती अधिनियमातील कलम 8(1)(j) मध्ये नमूद केलेल्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे अपिलार्थीस देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे व अपील निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख अफसर शेख बाबु, हमालपुरा, मस्जिदजवळ, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, आस्थापना विभाग,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन),नांदेड वाघाळा शहर महानगपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गजानन विठ्ठलराव चव्हाण,<br>रा. लोहा, ता.लोहा, जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, लोहा,<br>ता. लोहा, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय,लोहा,<br>ता.लोहा, जि.नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गजानन विठ्ठलराव चव्हाण | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक कार्यालय निरीक्षक, नगर परिषद, लोहा, जि.नांदेड- श्री. खरात आर.टी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय,लोहा,ता.लोहा, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २३.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी लोहा शहरातील देशी दारु दुकानांना नगर परिषदेने दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राच्या मूळ प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. अपिलार्थी यांना दि. २२.०८.२०१० रोजी माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली आहे. तथापि त्यांना प्राप्त झालेली माहिती देशी दारुच्या दुकानासंदर्भातील नाही, त्यामुळे त्यांना अशा दुकानांसाठी नगरपरिषद,लोहा कार्यालयाकडून दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रांच्या प्रती आवश्यक होत्या.

ही बाब विचारात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19(8)(a) मधील प्राप्त अधिकाराचा वापर करुन आयोगातर्फे मुख्याधिकारी, नगर परिषद, लोहा यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात नव्याने सुनावणी घेऊन दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारित करावा. तसेच सदरची माहिती लोहा नगर परिषदेच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखामधून अपिलार्थीस पाठविण्याची जबाबदारी मुख्याधिकारी, नगर परिषद, लोहा यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे. अशाप्रकारची माहिती उपलब्ध नसल्यास माहितीचा शोध घ्यावा व माहिती उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे अपिलार्थीस कळविण्याची व्यवस्था करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लोहा, जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. २३.०३.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन विठ्ठलराव चव्हाण,विठ्ठलकृपा निवास,मेनरोड लोहा, ता.लोहा, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक कार्यालय निरीक्षक, नगर परिषद, लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय,लोहा,ता.लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. उध्दवराव शामराव शिंदे, | : | अपिलार्थी |
| | रा.तरोडा बु. नांदेड | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| | जिल्हाधिकारी कार्यालय, | | |
| | हिंगोली | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -नायब तहसीलदार(महसूल), तहसील कार्यालय,वसमत,जि.हिंगोली - श्री. उमेश राजाराम बोथीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, जि. हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.४ | निवासी उपजिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. रघुनाथ वै. मिटकरी, नायब तहसीलदार (निवडणूक) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी नायब तहसीलदार(निवडणूक),जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली यांनी युक्तिवादात कथन केले की, अपिलार्थी यांचा दि. १६.०२.२०१० रोजीचा अर्ज त्यांच्याकडे दि. १७.०२.२०१० रोजी प्राप्त झाला. माहिती वसमत तालुक्याशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), वसमत यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय,वसमत यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती संकलीत करुन माहिती कळविली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. तथापि त्यांनी प्रतिसाद दिला नाही. संदर्भित रस्त्याच्या रुंदीचे अभिलेखे त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे त्यासंदर्भातील तपशील उपविभागीय अभियंता, वसमत यांच्याकडून घ्यावा लागेल.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार(म.),तहसील कार्यालय, वसमत, जि.हिंगोली यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीच्या प्रती आज रोजी आयोगास अवलोकनास्तव सादर केल्या. सदर माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, वसमत,जि.हिंगोली यांनी वरीलप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उध्दवराव शामराव शिंदे,रा.घर क्र.६९, माणिकनगर,तरोडा बु. नांदेड-४३१ ६०५

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, वसमत,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत,जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निवासी उपजिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शेख अनवर शेख मन्नु,<br>रा. नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा विभाग),<br>तहसील कार्यालय,नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा विभाग),तहसील कार्यालय,नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. मोटे व्ही.एच.तलाठी सजा वाजेगाव,ता.जि.नांदेड | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातल मौ.लिंबगाव येथील तीन त्रयस्थ किरकोळ रॉकेल परवानाधारकांना शासनाकडून दिलेल्या रॉकेल वितरण व स्टॉक रजिस्टरची माहिती मागितली आहे. त्यामध्ये पुरवठा निरीक्षक यांनी तपासणी केलेल्या मासिक अहवालाच्या सत्यप्रती इत्यादीचीही माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी- परवाना दिल्यापासून ते दि. ०१.१०.२००९ पर्यंत असा मोठा आहे.

अपिलार्थीस त्रयस्थ दुकानदारांकडून माहिती प्राप्त करुन घेऊन देण्यात आलेली आहे व त्यासंदर्भातील पोच अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,नांदेड यांना दिल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख अनवर शेख मन्नु, घर नं. ४९, ब्लॉक नंबर ४, लेबर कॉलनी, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा विभाग),तहसील कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्रीमती सरस्वतीबाई नागोराव पुराड,<br>रा. पुनेगाव, ता.जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी,<br>तलाठी सज्जा, वाजेगाव, ता.जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय,नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तलाठी,तलाठी सजा, वाजेगाव, ता.जि.नांदेड - श्री. मोटे व्ही.एच | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय,नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"खरेदी विक्री खताअधारे फेरफार नोंद करणेसंबंधी दि. २५.०८.२००९ रोजी तहसील कार्यालय नांदेड येथे अर्ज दिला. गट क्र. १३/३ असून ०१ गुंठा वाजेगाव येथील जमीन खरेदी केली (अ पत्रकप्रमाणे २० दिवसात फेर करणे बंधनकारक असून) आजपर्यंत मी सर्व कागदपत्रासह अर्ज देऊन फेर नोंद केलेली दिसत नाही तरी मला माझ्या खरेदी विक्री खत अधारे फेरफार नोद घेऊन फेरफार ब ची प्रमाणित नक्कल देण्यात यावी."

अपिलार्थीस सदरची माहिती देण्यात आली आहे व त्यासंदर्भातील पोच अपिलार्थी यांनी दिलेली आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती सरस्वतीबाई नागोराव पुराड,रा. पुनेगाव, ता.जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी,तलाठी सजा, वाजेगाव, ता.जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अविनाश पुंडलिकराव इटकापल्ले, : अपिलार्थी
रा. गडगा, ता. नायगांव (खै.),जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,
नायगाव (खै.), जि. नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,तहसील कार्यालय, नायगाव (खै.),
जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८७५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अविनाश पुंडलिकराव इटकापल्ले | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकुन(पुरवठा), तहसील कार्यालय, नायगाव (खै.), जि.नांदेड - श्री.आर.एन.चौहान | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय, नायगाव (खै.),जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला आहे. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये एन.एफ.एफ.डब्ल्यू या योजनेअंतर्गत नायगाव तालुक्यातील दि. १५.०३.२००७ च्या अखेरपर्यंत धान्य वाटप केलेल्या मजूरांची यादी मागितली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या अर्जामध्ये माहितीचा कालावधी नमूद केलेला नाही. (यावरुन एन.एफ.ई.डब्ल्यू ही योजना सुरु झाल्यापासून ते अपिलार्थी यांनी अर्ज दाखल करेपर्यंत ) नायगाव तालुक्यामधील एकूण २६ गावांमध्ये १०६ स्वस्त धान्य दुकाने आहेत व या दुकानांमधून माहिती संकलीत करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये प्रतिपादन केले आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगाव (खै.), जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २१.०६.२०१० रोजी निर्णय घेतल्याचे दिसून येत आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, माहिती सन २००६ ची असल्यामुळे व संपूर्ण तालुक्याची असल्यामुळे एकत्रित करण्यास कालावधी लागत आहे.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. या सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती स्वेच्छेने कमी करुन एक-दोन स्वस्तधान्य दुकानांची नावे जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांच्या आत कळवावी. पुढील तीस दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी माहिती संकलीत करुन अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन (पुरवठा), तहसील कार्यालय, नायगाव (खै.), जि.नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील तीस दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अविनाश पुंडलिकराव इटकापल्ले,रा. गडगा, ता. नायगांव (खै.),जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन (पुरवठा), तहसील कार्यालय, नायगाव (खै.), जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय, नायगाव (खै.),जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जी.एस.रायबोळे, : अपिलार्थी
रा. किनवट, ता.किनवट,
जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, हदगाव,
ता. हदगाव, जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,
तहसील कार्यालय,हदगाव, ता.हदगाव,जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२४११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकून(सं.गा.यो.), तहसील कार्यालय, हदगाव, जि.नांदेड - श्री. यु.एल.रणवीर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय,हदगाव, ता.हदगाव,जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी ज्यावेळी माहिती मागितली होती त्यावेळी माहिती उपलब्ध नव्हती. ती कार्यकारी अभियंता, म.ग्रा.र.वि.संस्था विभाग,नांदेड यांच्याकडून मागविण्यात आली. ती माहिती नुकतीच दि. १७.०४.२०१२ रोजी प्राप्त झाली आहे. ती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्याकडे उपलब्ध आहे.

या सर्व बाबी पाहता, अपिलार्थीस ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून(सं.गां.यो.), तहसील कार्यालय, हदगाव, जि.नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जी.एस.रायबोळे,साप्ताहिक 'धुमाकूळ', किनवट, ता.किनवट,जि.नांदेड
२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून(सं.गां.यो.), तहसील कार्यालय, हदगाव, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय,हदगाव, ता. हदगाव, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. चंद्रकांत रंगनाथ काळे, : अपिलार्थी
२१, चैतन्य गुरुनगर, सिडको, एन-८, एफ-४, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/०३५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. चंद्रकांत रंगनाथ काळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७-०१-२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०७-०२-२०११

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०२-०२-२०१२ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आवश्यक कागदपत्रे आयोगास सादर करण्यासाठी आयोगास सुनावणीची पुढील तारीख देण्याची विनंती केली होती. त्यानुसार पुढील तारीख देण्यात येऊन प्रकरणात दिनांक १४-०३-२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. दिनांक १४-०३-२०१२ रोजी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे आयोगास अहवाल सादर करण्यासाठी सुनावणीस पुढील तारीख देण्याची विनंती केली. त्यांच्या विनंतीवरुन त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रकरणात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याकरिता पुढील तारीख देण्याचा निर्णय आयोगातर्फे घेण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०७-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंद्रकांत रंगनाथ काळे, २१, चैतन्य गुरुनगर, सिडको, एन-८, एफ-४, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. देशमुख जालींदर धोंडिराम, : अपिलार्थी
मु. पो. मस्साजोग, तालुका केज, जिल्हा बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, केज,
तालुका केज, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, तालुका केज,
जिल्हा बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१६०० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, केज,<br>तालुका केज, जिल्हा बीड - श्री. बिरादार के. जी. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, तालुका केज,<br>जिल्हा बीड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०५-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०४-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-०२-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २०-०३-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

प्रकरणात सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगासमोर माहितीची व्याप्ती कमी करुन मुद्दा क्रमांक १ ते ६ संदर्भातील माहिती मिळावी अशी विनंती केली. ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी एक महिन्याचा कालावधी मिळावा अशी आयोगास विनंती केली. त्यानुसार सुनावणीकरिता पुढील तारीख दिनांक २४-०४-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता निश्चित करण्यात आली होती. तसेच जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, केज श्री. भागवत देशमुख यांना कार्यालय प्रमुख या नात्याने व्यक्तिशः उपस्थित राहावे असे सूचित करण्यात आले होते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांना राज्य माहिती आयोगाने दिनांक २०-०३-२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार मुद्दा क्रमांक १ ते ६ ची माहिती दिली आहे. अपिलार्थी यांनी त्यांची पोच दिलेली आहे. अपिलार्थी यांचे दिनांक २४-०४-२०११ रोजीचे दिलेले पत्र आयोगापुढे आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, त्यांना मुद्दा क्रमांक १ ते ६ ची माहिती सुनावणीत ठरल्याप्रमाणे दिनांक २३-०४-२०११ रोजी मिळालेली आहे.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांना माहिती देण्यास विलंब झालेला आहे. याकरिता संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, केज, तालुका केज, जिल्हा बीड व त्यांचे संबंधित कर्मचारी यांना भविष्यात त्यांच्याकडे प्राप्त होणा-या माहिती अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत प्रतिसाद देण्याची सूचना देण्यात यावी असे जिल्हाधिकारी, बीड यांना कळविण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, तालुका केज, जिल्हा बीड श्री. भागवत देशमुख यांना कार्यालय प्रमुख या नात्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये आज रोजी सुनावणी उपस्थित राहण्याचे सूचित करण्यात आले होते. तथापि ते आज रोजी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीबाबत त्यांनी कोणतेही कारण आयोगास कळविलेले नाही, याची आयोग गंभीर दखल घेत असून याबाबतचा खुलासा त्यांना जिल्हाधिकारी, बीड यांच्यामार्फत आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जिल्हाधिकारी, बीड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देशमुख जालींदर धोंडिराम, मु. पो. मस्साजोग, तालुका केज, जिल्हा बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, केज, तालुका केज, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिराळे चंद्रशेखर बाबाराव, : अपिलार्थी
व्दारा, डॉ. जोंधळे यांची बिल्डींग, साई मंगल कार्यालयाच्या बाजूस, हडको बस स्टॉप जवळ, नवीन नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८७६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २६-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जुलै २००९ मधील कनिष्ठ लिपीक व वरिष्ठ लिपीक पदभरतीसंदर्भातील माहिती मागितली आहे.

प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सर्व माहितीच्या झेरॉक्स प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांची उपस्थिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये अनिवार्य करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०७-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिराळे चंद्रशेखर बाबाराव, व्दारा, डॉ. जोंधळे यांची बिल्डींग, साई मंगल कार्यालयाच्या बाजूस, हडको बस स्टॉप जवळ, नवीन नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बालाजी जळबा गवुळकर, : अपिलार्थी
रा. कदम निवास, महात्मा गांधी शाळेजवळ, मुदखेड,
तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद,
नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), सामान्य प्रशासन
विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०७-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये कक्ष अधिकारी, अधीक्षक, पदोन्नती दिलेल्या बिंदूनामावली रजिस्टरची झेरॉक्स प्रत, दिनांक ०१-०१-२००३ ते दिनांक ३०-१२-२००९ अधीक्षकांना कक्ष अधिकारी पदोन्नती दिलेल्या पदोन्नती सभा अहवालाची प्रत व आदेशाच्या प्रती व आजपर्यंत असलेल्या कक्ष अधिका-यांच्या जातीचा प्रवर्ग व त्यांना कक्ष अधिकारी पदी देण्यात आलेल्या पदोन्नतीचा प्रवर्ग व दिनांक ०१-०१-२००३ ते दिनांक ०१-०१-२००९ पर्यंतची जेष्ठता यादी, (कक्ष अधिकारी, अधीक्षक) व विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत केलेल्या तपासणीचा तपासणी अहवाल दिनांक ०१-०१-२००३ ते दिनांक ०१-०१-२००९ वरिष्ठ सहायक, कनिष्ठ सहायक जेष्ठता यादी अशी माहिती मागितली आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलात त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे असे नमूद केले आहे. माहितीच्या तपशीलामध्ये पदोन्नती, बिंदु नामावली रजिस्टरची सत्यप्रत न देणे असे नमूद केले आहे. ही बाब विचारात घेता सदरच्या माहितीच्या सत्यप्रती देण्याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जिल्हा परिषद, नांदेड यांच्यावर अपिलार्थीस सदरची माहिती देण्याची जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीस सदरची माहिती विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जिल्हा परिषद, नांदेड यांनी वर नमूद केल्या-प्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाव्दारे पाठविण्याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी जळबा गवुळकर, रा. कदम निवास, महात्मा गांधी शाळेजवळ, शारदा नगर, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख जमील शेख मियाँ, : अपिलार्थी
बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८७८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर,<br>तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर,<br>तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १६-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०५-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर येथे झालेल्या शहरातील घर व प्लॉटच्या नोंदीबाबत माहिती मागितलेली आहे. माहितीचा कालावधी सन ऑक्टोबर २००७ ते डिसेंबर २००९ असा आहे.

अपिलार्थीच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना सदरची माहिती मुदतीत दिली नाही असे दिसून येत आहे ही बाब विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील. तसेच अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब झालेला आहे किंवा कसा याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर, जिल्हा नांदेड यांनी चौकशी करुन यथोचित कार्यवाही करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २४-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख जमील शेख मियाँ, बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विजय माधवराव वाघमारे, : अपिलार्थी
मु. पो. गोकुंदा (दत्तनगर), तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, गोकुंदा,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८७९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विजय माधवराव वाघमारे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, गोकुंदा,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०३-०५-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. याची आयोगाने गंभीर दखल घेतीली आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१ जुलै ते ३१ डिसेंबर २००९ या कालावधीची खालील माहिती मागितली आहे.

१. उपरोक्त कालावधीत एकूण झालेल्या फेरफाराची संख्या.

२. उपरोक्त झालेल्या फेरफाराबाबत घेणार, देणार व्यक्तींची नावे व प्रत्येक व्यवहाराच्या खरेदी विक्रीची किंमत.

३. दानपत्र किंवा बक्षिस घेणार, देणा-याचे नांव.

४. उपरोक्त कालावधीत मंजूर झालेल्या लेआऊटचा तपशील, सर्व्हे नंबरसह.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार सदरची माहिती अपिलार्थीस देय होत आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांची उपस्थिती पुढील सुनावणीस अनिवार्य करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०७-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी तसेच गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांनी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विजय माधवराव वाघमारे, मु. पो. गोकुंदा (दत्तनगर), तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतोष रामराव बनसोडे, : अपिलार्थी
महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना,
मध्यवर्ती संपर्क कार्यालय, जिल्हा उपाध्यक्ष,
रा. मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पंचायत समिती कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मुखेड,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संतोष रामराव बनसोडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड,<br>जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मुखेड,<br>तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. याची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये एकंदर १३ त्रयस्थांच्या विहिरींबाबत माहिती मागितली आहे. तसेच अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांच्याकडे दिनांक २०-०३-२०१० रोजी प्रथम अपील सादर केले. तथापि त्यावरही सुनावणी झालेली नाही.

अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर माहिती देण्याच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय देणे आवश्यक ठरत होते.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०४-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष रामराव बनसोडे, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना, मध्यवर्ती संपर्क कार्यालय, जिल्हा उपाध्यक्ष, रा. मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. महमद अब्दुल राफे एम. ए. समी., : अपिलार्थी
रा. घर नंबर १९, त्रिवेणी नगर, जिल्हा परिषद गृहनिर्माण
संस्था, तरोडा (बु.), तालुका जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम, प्राथमिक शाळा, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम, प्राथमिक शाळा, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २९-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महमद अब्दुल राफे एम. ए. समी., रा. घर नंबर १९, त्रिवेणी नगर, जिल्हा परिषद गृहनिर्माण संस्था, तरोडा (बु.), तालुका जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम, प्राथमिक शाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| | श्री. बाबाराव लक्ष्मणराव डाखोरे,<br>रुपा गेस्ट हाऊस जवळ, वसंतनगर, नांदेड - २ | : अपिलार्थी |
| | **विरुध्द** | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, वेतन पथक (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८८२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, वेतन पथक (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०६-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये "श्री. बी. एल. डाखोरे, सह शिक्षक, श्री. साईबाबा प्राथमिक शाळा, हनुमानगड, नांदेड यांचे पुरग्रस्त कर्ज रुपये २९९२५ (एकोनतीस हजार नऊशे पंचेवीस रुपये) वेतनातून कपात झालेली रक्कम शासनाच्या तिजोरीत जमा झाली किंवा नाही याबाबत माहिती देणेबाबत माझे आपणास लेखी पत्र दिनांक २४-०६-२००९ व दिनांक ०५-०२-२००९ नुसार रितसर अर्ज दिले आहेत या अर्जावर आपण कोणती कारवाई केली त्याची प्रत मिळणेबाबत", अशी माहिती मागितली आहे.

अपिलार्थी यांच्या दिनांक ०४-०३-२०१० च्या प्रथम अपिलामध्ये त्यांना योग्य ती माहिती मिळाली नाही असे नमूद केल्याचे दिसून येत आहे व व्दितीय अपिलामध्ये शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन त्यांची बाजू ऐकून घेतली नाही, असे नमूद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबाराव लक्ष्मणराव डाखोरे, रुपा गेस्ट हाऊस जवळ, वसंतनगर, नांदेड - २.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन पथक (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. साजीद अहेमद गुलाम जिलानी जागीरदार, : अपिलार्थी
मौलाना आझाद नगर, दैनिक नया कदम कार्यालयाजवळ,
नई आबादी, नांदेड - ४३१ ६०२

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, फैजुल उलुम माध्यमिक शाळा, गोकुळनगर, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८८३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, फैजुल उलुम माध्यमिक शाळा, नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २२-०४-२००९ च्या माहिती अर्जासंदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार दिनांक १९-०६-२०१० रोजीचे व्दितीय अपील दाखल केले आहे. सदरचे व्दितीय अपील मुदतीत दाखल केलेले नसून २९ दिवसांचा विलंब या व्दितीय अपीलामध्ये आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी प्रथम अपील सुध्दा २४१ दिवसांच्या विलंबाने दाखल केलेले आहे असे दिसून येत आहे. तसेच अपिलार्थी यांनी व्दितीय अपिलाच्या विलंबासाठी कोणतेही समर्थनीय कारण दिलेले नाही. याकरिता सदरचे व्दितीय अपील दाखल स्तरावर निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साजीद अहेमद गुलाम जिलानी जागीरदार, मौलाना आझाद नगर, दैनिक नया कदम कार्यालयाजवळ, नई आबादी, नांदेड - ४३१ ६०२.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, फैजुल उलुम माध्यमिक शाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद अहेमद सय्यद मोहीयोद्दीन, : अपिलार्थी
रा. लक्की किराणा स्टोअर्स, बरकतपुरा, वाघा रोड, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय, हदगांव,
तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक वन संरक्षक (तेंदु), सहायक वनसंरक्षक कार्यालय,
नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय, हदगांव,<br>तालुका हदगांव, जिल्हा नांदेड - श्री. डी. एन. शंकरवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वन संरक्षक (तेंदु), सहायक वनसंरक्षक कार्यालय,<br>नांदेड - श्री. चंद्रशेखर देविदास सरोदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १८-०१-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २२-०९-२००९ च्या माहिती अर्जान्वये, त्यांच्या कार्यालयामार्फत आर्थिक वर्ष २००० ते डिसेंबर २००७ पर्यंत रोजगार हमी योजने अंतर्गत झालेल्या कामाची गावनिहाय यादी, एलबी एस सिटीएस या कामाची संपूर्ण यादी, अंदाजपत्रक व कामाच्या एम. बी. च्या सत्यप्रती, झालेल्या कामावर उपस्थित असलेल्या मजुरांचे हजेरी मस्टर, पे शिटच्या सत्यप्रती, आर्थिक वर्षात रोजगार हमी योजने शिवाय कोणकोणत्या योजना राबविण्यात आल्या, त्याकरिता शासनाकडून किती निधी उपलब्ध झाला, निधी कोणकोणत्या कामावर खर्चण्यात आला त्याचा लेखी तपशील, काम केलेल्या संस्था, एजंसीची नांवे, त्यांना अदा केलेल्या देयकांच्या सत्यप्रती तसेच नमुना-४ च्या तपशीलवार सत्यप्रती, अशी माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००० ते डिसेंबर २००७ असा आठ वर्षाचा आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठी असल्याकारणाने आढावा घेऊन दिनांक १९-१०-२००९ रोजी माहिती पुरविण्याकरिता रुपये ७९७०० इतक्या शुल्काचा भरणा करावा असे अपिलार्थीस स्पीड पोस्टाने कळविले. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीस प्रथम अपिलामध्ये त्यांना शुल्काचा भरणा करावा ही बाब ज्ञात करुन देण्यात आली आहे असे त्यांच्या प्रथम अपिलावरुन दिसून येत आहे. तसेच त्यांना शुल्क कोणत्या शीर्षाखाली भरावे याबाबत तपशील कळविण्यात आला आहे. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (तेंदु), नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ३०-१२-२००९ रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांना कळविलेल्या रुपये ७९७०० या शुल्काचा तपशील देण्यात यावा व अपिलार्थीने शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दहा दिवसापर्यंत माहिती देण्यात यावी. जन माहिती अधिकारी यांनी त्याप्रमाणे अपिलार्थीस तपशील कळविलेला आहे. या बाबी कागदपत्रांवरुन दिसून येत आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत शुल्काचा भरणा करण्याकरिता कळविलेली रक्कम, या रकमेचा कळविलेला तपशील व अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील नाहीत या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा करुन माहिती घेणे योग्य ठरत आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अपिलार्थी यांना माहितीची आवश्यकता असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्याकडे या शुल्काचा भरणा करावा व जन माहिती अधिकारी यांनी पुढील पंधरा दिवसात अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात माहिती अपिलार्थीस द्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने शुल्काचा भरणा केल्यास अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात पुढील पंधरा दिवसांच्या आत माहिती नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २४-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद अहेमद सय्यद मोहीयोद्दीन, रा. लक्की किराणा स्टोअर्स, बरकतपुरा, वाघा रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (तेंदु), सहायक वनसंरक्षक कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. एस. पी. नैन, : अपिलार्थी

व्दारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :

सहायक वन संरक्षक (तेंदु), सहायक वनसंरक्षक कार्यालय, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८८५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड - श्री. डी. एन. शंकरवार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वन संरक्षक (तेंदु), सहायक वनसंरक्षक कार्यालय, नांदेड - श्री. चंद्रशेखर देविदास सरोदे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-१२-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०१-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २३-०९-२००९ च्या माहिती अर्जान्वये, त्यांच्या कार्यालयामार्फत आर्थिक वर्ष २००२ ते डिसेंबर २००७ पर्यंत रोजगार हमी योजने अंतर्गत झालेल्या कामाची गावनिहाय यादी, एलबी एस सिटीएस या कामाची संपूर्ण यादी, अंदाजपत्रक व कामाच्या एम. बी. च्या सत्यप्रती, झालेल्या कामावर उपस्थित असलेल्या मजुरांचे हजेरी मस्टर, पे शिटच्या सत्यप्रती, आर्थिक वर्षात रोजगार हमी योजने शिवाय कोणकोणत्या योजना राबविण्यात आल्या, त्याकरिता शासनाकडून किती निधी उपलब्ध झाला, निधी कोणकोणत्या कामावर खर्चण्यात आला त्याचा लेखी तपशील, काम केलेल्या संस्था, एजंसीची नांवे, त्यांना अदा केलेल्या देयकांच्या सत्यप्रती तसेच नमुना-४ च्या तपशीलवार सत्यप्रती, अशी माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००२ ते डिसेंबर २००७ असा आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठी असल्याकारणाने आढावा घेऊन त्याबाबत दिनांक १९-१०-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शुल्काचा भरणा करण्याबाबत कळविले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीस प्रथम अपिलामध्ये शुल्काचा भरणा करावा ही बाब ज्ञात करुन देण्यात आली आहे, असे त्यांच्या प्रथम अपिलावरुन दिसून येत आहे. तसेच त्यांना शुल्क कोणत्या शीर्षाखाली भरावे याबाबत तपशील कळविण्यात आला आहे. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (तेंदु), नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ३०-१२-२००९ रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थी यांना कळविलेल्या रुपये ७१२९८ या शुल्काचा तपशील देण्यात यावा व अपिलार्थीने शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दहा दिवसापर्यंत माहिती देण्यात यावी. जन माहिती अधिकारी यांनी त्याप्रमाणे अपिलार्थीस तपशील कळविलेला आहे. या बाबी कागदपत्रांवरुन दिसून येत आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती, माहितीचा कालावधी, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत शुल्काचा भरणा करण्याकरिता कळविलेली रक्कम, या रकमेचा कळविलेला तपशील व अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील नाहीत या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा करुन माहिती घेणे योग्य ठरत आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अपिलार्थी यांना माहितीची आवश्यकता असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्याकडे या शुल्काचा भरणा करावा व जन माहिती अधिकारी यांनी पुढील पंधरा दिवसात अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात माहिती अपिलार्थीस द्यावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने शुल्काचा भरणा केल्यास अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात पुढील पंधरा दिवसांच्या आत माहिती नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. एस. पी. नैन, व्दारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (तेंदु), सहायक वनसंरक्षक कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. युवराज तुळशीरामजी मुंडे, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
(स्टेशनरी छपाई विभाग),नांदेड

जन अपिलीय अधिकारी, :
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. युवराज तुळशीरामजी मुंडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपवित्तीय व अकाऊन्टस अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - वित्तीय व अकाऊन्टस अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे वकील श्री. आर.टी.देशमुख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांचेतर्फे वकील उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आलेली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांची बाजू ऐकून न घेता प्रथम अपिल निकाली काढलेले आहे.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे वकिलांनी सुनावणीमध्ये त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ द्वारा दैनिक प्रजावाणीतील दि. १०.११.२००९ व वेबसाईटद्वारे दिलेल्या निविदेसंदर्भात एकूण ७ विविध मुद्यांवर माहिती मागितली आहे. अशाप्रकारची निविदा दि. १०.११.२००९ रोजी दै.प्रजावाणी या दैनिकामध्ये देण्यात आलेली नाही म्हणून माहिती देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन या प्रकरणात निर्णय देण्यात आलेला आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्या वकीलांना पृष्छा केली की, दै.प्रजावाणीमध्ये दि. १०.११.२००९ रोजी विचाराधीन निविदेची जाहीरात देण्यात आलेली नाही ही बाब विचारात घेतली नाही तरी,वरील दिवशी ही जाहीरात संकेतस्थळावर देण्यात आली होती काय, असल्यास सदर माहिती देय होईल. अशाप्रकारची निविदा दि. १०.११.२००९ रोजी काढण्यातच आली नाही, त्यामुळे संकेतस्थळावर देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांचे अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. युवराज तुळशीरामजी मुंडे,संपादक, सा. बेरोजगार व्यथा, वसंत भवन, मारोती मंदिराजवळ,शिवाजीनगर,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपवित्तीय व अकाऊन्टस अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वित्तीय व अकाऊन्टस अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रमेश सुभानजी गंगासागरे,<br>रा. उमरी, जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>वैद्यकीय अधिक्षक,<br>ग्रामीण रुग्णालय,उमरी, ता.उमरी,<br>जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा शल्यचिकित्सक,<br>सामान्य रुग्णालय,नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रमेश सुभानजी गंगासागरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कनिष्ठ लिपीक, ग्रामीण रुग्णालय,उमरी,जि.नांदेड - श्री. एन.के.डोमपल्ले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय,उमरी, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | डॉ. उत्तम मारोतराव इंगळे, निवासी वैद्यकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय,नांदेड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९.०६.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला आहे. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये त्रयस्थ-डॉ. पद्मावती गंगाधर यडपलवार यांच्या संदर्भात माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"त्रयस्थ-डॉ. पद्मावती गंगाधर यडपलवार यांनी दि. ३१.०३.२००९ ते १७.०२.२०१० पर्यंत आणि किती डयुटी केले आणि दि. ३१.०३.२००९ ते आजपर्यंत किती रजा उपभोगलात याच्या साक्षांकित प्रती देण्यात याव्यात. अंतररुग्ण व बाहयरुग्ण विभागात दि. ३१.०३.२००९ ते १७.०२.२०१० पर्यंत एकूण रुग्णांची संख्या देण्यात यावी."

जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपीक, ग्रामीण रुग्णालय,उमरी,जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत दि. १५.०३.२०१० रोजी प्रतिसाद देऊन माहितीची व्याप्ती विचारात घेता झेरॉक्स प्रती देता येत नाही तरी आपल्या सवडीनुसार स्वतः कार्यालयात उपस्थित राहून सर्व माहिती पाहू शकतात, असे कळविलेले आहे.

अपिलार्थी यांनी दि. १५.०३.२०१० रोजी माहिती घेतली असून त्यासंदर्भात पोच दिली आहे. तथापि अपूर्ण माहिती दिली, अशी नोंद केली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपीक, ग्रामीण रुग्णालय,उमरी,जि.नांदेड यांनी एक दिवस निश्चित करुन अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवून त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती उपलब्ध आहे, ती कागदपत्रे पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावीत या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(j)नुसार माहितीचा अधिकार या व्याख्येमध्ये माहिती प्राप्त करण्याच्या पहिल्या पर्यायानुसार माहितीची पाहणी दिली म्हणजे माहिती दिली असे होते. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची पाहणी देणे अधिनियमातील कलम ७(९) नुसार योग्य ठरत आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी (तथा कनिष्ठ लिपीक, ग्रामीण रुग्णालय, उमरी, जि. नांदेड) वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००)

करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमेश सुभानजी गंगासागरे,रा.उमरी, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपीक, ग्रामीण रुग्णालय,उमरी,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय,उमरी, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख रज्जाक शेख अनवर, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सह आयुक्त (आस्थापना),आस्थापना विभाग,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपआयुक्त (सामान्य प्रशासन विभाग),
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक आयुक्त (आस्थापना), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड- श्री. एस.एन.जाधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उपआयुक्त (सामान्य प्रशासन विभाग),नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. १२.१०.२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये पंप ऑपरेटर पदाच्या भरतीसंदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. माहिती संकलीत करुन दि. २३.०४.२०१२ रोजी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे व अपिलार्थी यांनी त्यासंदर्भात पोच दिलेली आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख रज्जाक शेख अनवर, रा. बडीदर्गाह, छोटा दरवजा, गाडीपुरा, नांदेड, ता.जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (आस्थापना),नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन विभाग),नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. माधव संभाजीराव डोम्पले, : अपिलार्थी
रा. हरबळ, पो. सोनखेड, ता.लोहा,
जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यालय अधिक्षक,
नगर परिषद, लोहा, ता.लोहा, जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी,
नगर परिषद, लोहा, ता.लोहा,जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक कार्यालयीन निरीक्षक, नगर परिषद, लोहा, जि. नांदेड - श्री. रामराव टिकाराम खरात | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, लोहा, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०५.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी अनुपस्थित राहण्याची आयोगास अनुमती मागितली. ती मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी तथा सहायक कार्यालयीन निरीक्षक, नगर परिषद, लोहा, जि.नांदेड यांनी सुनावणीच्यावेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १५.०२.२०१० रोजीच्या माहिती अर्जाद्वारे नगरपरिषद, लोहा अंतर्गत मालमत्ता हस्तांतरण या विषयाशी संबंधित एकूण १० मुद्यांद्वारे विस्तृत माहिती मागितली आहे. माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला. उपलब्ध माहिती दि. २४.०९.२०१० रोजीच्या पत्राद्वारे पाठविण्यात आली आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २४-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माधव संभाजी डोम्पले,मु.हरबळ (प.उ.), पो. सोनखेड,ता.लोहा, जि.नांदेड - ४३१ ७२५.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक कार्यालयीन निरीक्षक, नगर परिषद, लोहा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लोहा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ढवळे चंद्रकांत दशरथ, : अपिलार्थी
रा. पाटोदा, ता.नायगाव खै.,
जि. नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,
नायगाव (खै.), जि. नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,
तहसील कार्यालय, नायगाव (खै.),
जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकून (पु),तहसील कार्यालय, नायगाव (खै.), जि. नांदेड - श्री. आर. एन.चौहान | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय, नायगाव (खै.),जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | प्रतीवर तारीख नाही. |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०३.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी जानेवारी २००५ ते जुलै २००९ या कालावधीची विविध मुद्यांवर स्वस्तधान्य दुकान मौ. पाटोदा, ता. नायगाव खै. जि.नांदेड यांची माहिती मागितली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत व ते दारिद्रयरेषेखालील आहेत. अपिलार्थी यांना अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही. या बाबीची नोंद आयोग घेत आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठया प्रमाणात आहे व बहुतांश माहिती स्वस्तधान्य दुकानदारांकडे असण्याची शक्यता आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय घेण्याकरिता प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगाव(खै),जि.नांदेड यांनी नव्याने सुनावणी घेऊन यथोचित निर्णय पारित करावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगाव (खै.), जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. २२.०३.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ढवळे चंद्रकांत दशरथ, मु.पो.पाटोदा, ता.नायगाव (खै.), नांदेड
२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (पु),तहसील कार्यालय, नायगाव (खै.), जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय, नायगाव (खै.), जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कदम दिगंबर पांडुरंग, : अपिलार्थी
रा. धर्माबाद, ता.धर्माबाद, जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा, : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय,
धर्माबाद/बिलोली, जि. नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, देगलुर,
जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, जि. नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. डी.टी.सोनटक्के, नायब तहसीलदार | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, देगलुर, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,धर्माबाद यांनी दि. २३.०४.२०१२ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास अवगत केले की, सदरच्या प्रकरणी मूळ अभिलेखांची तपासणी केली असता, अभिलेखात माहिती आढळली नाही. करिता शोध सुरु आहे. तारीख वाढवून देण्यात यावी. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. आयोगाकडील पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी मूळ संचिकेसह माहिती देण्याच्या अनुषंगाने उपस्थित राहावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

पुढील सुनावणी दि. ०७.०६.२०१२ सकाळी ११.३० वा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कदम दिगांबर पांडुरंग, पानसरेनगर,राममंदिरासमोर, धर्माबाद, जि.नांदेड-४३१८०९

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,धर्माबाद, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देगलुर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाबुराव लच्छना ओध्दीवार, : अपिलार्थी
रा. किनवट, जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा विभाग),
तहसील कार्यालय, माहूर, जि. नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,
तहसील कार्यालय, माहूर
जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा विभाग),तहसील कार्यालय, माहूर, जि. नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय, माहूर,जि.नांदेड - श्री. डी.बी. सुरडकर | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष- श्री. शेख चाँद रतनजी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,माहूर, जि.नांदेड यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती तयार करण्यात येऊन दि. १८.०८.२०१० रोजी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती विनामूल्य हस्तगत करण्याचे कळविण्यात आले. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. तदनंतर त्यांना कार्यालयाच्या खासदुतामार्फत दि. १६.०४.२०१२ रोजीच्या पत्राद्वारे माहिती देण्यात आली ओह. अपिलार्थी यांनी ती दि. १९.०४.२०१२ रोजी व्यक्तिशः हस्तगत केली आहे. यासंदर्भातील अपिलार्थीची पोच त्यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबुराव लच्छना ओध्दीवार,रा.साईनगर, किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा विभाग),तहसील कार्यालय, माहूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय, माहूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अवधुत मारोतराव पाटील, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव,
कृषि उत्पन्न बाजार समिती,नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>**आदेश**</u>

पुढील तारीख दि. ०७.०६.२०१२ सकाळी ११.३०

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अवधुत मारोतराव पाटील, द्वारा धम्मदिपचावरे,मु.पो.उस्माननगर,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राम भुजंगा किडे,<br>रा. चिखलभोसी, पो. पानभोसी,<br>ता.कंधार, जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड श्री. संजय वसंतराव पार्डीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये एकूण तीन मुद्यांवर माहिती मागितली आहे. यामध्ये उपजिल्हाधिकारी,रोहयो, नांदेड यांच्या दि. २०.०७.२००९ रोजीच्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीचा तपशील व अधीक्षक अभियंता यांचे दि. ०१.१०.२००८ व दि. २९.०६.२००९ च्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून केलेल्या कार्यवाहीचा तपशील- ही माहिती अपेक्षित आहे.

अपिलार्थीच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत दि. १६.०४.२०१० रोजीच्या पत्राद्वारे एका मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २४.०५.२०१० रोजी दिलेल्या निर्णयानुसार उर्वरित २ व ३ च्या संदर्भातील माहिती दि. १४.०६.२०१० रोजी पोस्टाने पाठविण्यात आली आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राम भुजंगा किडे,रा. चिखलभोसी, पो. पानभोसी,ता.कंधार, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दिगांबर गोपाळराव साळुंके,<br>रा. पाटोदा (बु.),<br>ता.धर्माबाद, जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,धर्माबाद, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर,<br>जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २४-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग धर्माबाद, जि.नांदेड - श्री. एल.व्ही. भरडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर,जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एम.एम.बेग, प्रथम लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९.०३.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२३.०३.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" १) सन मार्च २००७ ते मार्च २०१० पर्यंत शासनाकडून किरकोळ खर्चासाठी प्राप्त झालेली एकूण रक्कम प्रत्येक महीणेवारी व कोणत्या कामासाठी खर्च करण्यात आली त्या रजिस्टरचा (कीर्द) उतारा नोंदी व बीलाचे सत्यप्रत वरील खर्चाची तपशीलवार माहिती मिळणेबाबत व

२) मार्च २००७ ते मार्च २०१० ब-१ रजिस्टरचा उतारा मिळणेबाबत."

माहितीचा कालावधी मार्च, २००७ ते मार्च २०१० असा आहे. अपिलार्थी यांना माहिती पुरविण्याच्या संदर्भात येणारे एकूण शुल्क रु.१७८४/- इतके भरणा करण्याबाबत दि. २९.०३.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर दि. २३.०४.२०१० रोजी अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांची तशी पोच जन माहिती अधिकारी यांच्या दप्तरी दाखल आहे.अपिलार्थी यांच्या दि. १२.०७.२०१० रोजीच्या द्वितीय अपिलामध्ये त्यांना किरकोळ खर्चाच्या पावत्यांच्या सत्यप्रती अपेक्षित केल्या आहेत, असे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांना देण्यात आलेल्या पावत्यांच्या प्रती अपिलाथी यांनी कार्यालयात उपस्थित राहिल्यास कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर,जि.नांदेड यांनी त्याच्या सत्यप्रती विनामूल्य करुन देण्याची व्यवस्था करुन द्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २४-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिगांबर गोपाळराव साळुंके, मु.पाटोदा (बु.), ता.धर्माबाद, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग धर्माबाद, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. देविदास धर्मराज खरात,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सहसंचालक,<br>तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१५८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. देविदास धर्मराज खरात | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१०<br>(फेरसादर दि.२०.०१.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे.-----पुढील तारीख दि.०७.०६.२०१२ सकाळी ११.३० वा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

पुढील तारीख--

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देविदास धर्मराज खरात

२. जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक,तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक,तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुगत ज्ञानदेव गायकवाड,<br>रा.कळंब, ता.कळंब,जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (म),तहसील कार्यालय,<br>कळंब, जि. उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, कळंब,<br>जि.उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म),तहसील कार्यालय, कळंब, जि. उस्मानाबाद - श्री. व्ही.ए.बोंदर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय, कळंब,जि.उस्मानाबाद - श्री. डी.एच.राठोड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०३.२०१० |

यापूर्वी दि. ३०.१२.२०११, ०१.०२.२०१२ व दि.०६.०३.२०१२ रोजी या प्रकरणाची सुनावणी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. त्यांची व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,कळंब यांची बाजू ऐकून घेण्याकरिता आयोगातर्फे सुनावणीची पुढील तारीख दि. २५.०४.२०१२ अशी निश्‍चित करण्यात आली होती. त्याप्रमाणे आज सुनावणी घेण्यात येत आहेत. आज रोजी देखील सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. ०९.११.२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये - मौजा कसबे कळंब मधील स.नं.६७/ब/१ चे खसरा पहाणी पत्रक (२) स.नं.६७/अ/१ चे पहाणी पत्रक १९५५-५६ ते १९५९-६०,(३) शेतवार पत्रक १५२९ बसली (४) स.नं. ६७/अ व ६७/ब चे पोटहिस्सा सर्व्हे नं. मोजणी रजिस्टरची नक्कल (५) स.नं. ६७/अ व ६७/ब चे १९५०-५१ ते १९५३-५४ चे पहाणी पत्रकाची नक्कल - अशी माहिती मागितली आहे. त्यापैकी मुद्दा क्र.१ ते ४ संदर्भात स.नं.६७ब/१ खासरा पाहणी पत्रक २ व स.नं.६७अ व ६७ब चे पोटहिस्सा सर्व्हेनंबरचे मोजणी रजिस्टर नक्कल अपिलार्थीस समक्ष देण्यात आली आहे. सदरची माहिती सुमारे ६१ वर्षांपूर्वीची असून कार्यालयामध्ये पुरेसा शोध घेऊन पाहणीसाठी माहिती उपलब्ध करुन दिली आहे.तसेच मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ संदर्भातील स.नं. ६७अ व ६७ब चे सन १९५०-५१ ते १९५३-५४ चे पाहणीपत्रकाची जीर्ण अवस्था झाल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देता आली नाही. त्यामुळे या सर्व कागदपत्रांची विनामूल्य पाहणी दिली आहे. अपिलार्थी यांनी विनामूल्य पाहणी घेतली आहे.

या सर्व बाबी पाहता अपिलार्थीचे अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुगत ज्ञानदेव गायकवाड, रा. भिमनगर,कळंब,जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म),तहसील कार्यालय, कळंब, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय, कळंब,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. माधव खंडेराव वाघमारे,<br>मु. पो. शेकापूर, तालुका कंधार, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, बालसदन व रामकृष्ण बालग्राम, रामनगर,<br>बिजेवाडी, तालुका कंधार, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विशेष समाजकल्याण अधिकारी, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, बालसदन व रामकृष्ण बालग्राम, रामनगर,<br>बिजेवाडी, तालुका कंधार, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विशेष समाजकल्याण अधिकारी, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. अपिलार्थी यांनी दिनांक १३-०२-२०१० च्या माहिती अर्जान्वये बालसदन व रामकृष्ण बालग्राम, रामनगर, बिजेवाडी, तालुका कंधार, जिल्हा नांदेड संदर्भात माहिती मागितली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-०३-२०१० च्या प्रथम अपिलावर नव्याने सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (7) व 19 (8) (a) अन्वये आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार आयोग जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, नांदेड यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करित आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माधव खंडेराव वाघमारे, मु. पो. शेकापूर, तालुका कंधार, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, बालसदन व रामकृष्ण बालग्राम, रामनगर, बिजेवाडी, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, शास्त्रीनगर, २४, गणेश कृपा बिल्डींग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजू शिवलिंग पिल्लेवार, : अपिलार्थी
रा. शिवलिंग निवास, राजेंद्रनगर, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८९७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजू शिवलिंग पिल्लेवार | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०१-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. याची गंभीर दखल आयोगाने घेतली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी दिनांक २६-११-२००९ च्या माहिती अर्जान्वये किनवट येथील मोबाईल टॉवरसंदर्भात माहिती मागितली आहे. असे वीस मोबाईल टॉवर किनवट शहरात आहेत व त्यांनी नगरपालिकेची कोणत्याही प्रकारे परवानगी न घेता बांधकाम केलेले आहे. ही माहिती त्यांना मिळाली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांनी, त्यांनी दाखल केलेल्या दिनांक १२-०१-२०१० च्या प्रथम अपिलावर निर्णय दिलेला नाही. आयोगास ही बाब योग्य वाटत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमध्ये व्यापक जनहित दिसून येत आहे. याकरिता प्रथम अपिलावर सुनावणी घेणे आवश्यक ठरत आहे.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०४-२०१२**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजू शिवलिंग पिल्लेवार, रा. शिवलिंग निवास, राजेंद्रनगर, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. माधवराव बापुराव पवार, : अपिलार्थी
चेअरमन पांचाळपूर, पत्रकार सहकारी गृहनिर्माण संस्था, म. कंधार,
रा. काटकळंबा, तालुका कंधार, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कंधार,
तालुका कंधार, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. माधवराव बापुराव पवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड - श्री. भगवान भुजंगराव बनसोडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०६-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २६-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी दिनांक ०८-०६-२०१० च्या माहिती अर्जान्वये दिनांक ०२-०७-१९९० जिल्हाधिकारी, नांदेड यांनी सीआर-२८३/८४ च्या आदेशान्वये स. नं. २१ मधील ५० आर जागा त्यांच्या संस्थेस दिली आहे. तदनंतर बांधकाम करण्याकरिता अनुमती मागण्यात आली असता ही जागा आरक्षित आहे असे त्यांना कळविण्यात आले आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या संस्थेस जागा दिली तेव्हा या जागेवर आरक्षण होते किंवा कसे याबाबतची माहिती मागितली आहे. अतः आरक्षणाबाबतची कागदपत्रे त्यांना अपेक्षित आहे.

अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर त्यांना अद्यापपावेतो माहिती देण्यात आलेली नाही तसेच त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय घेण्यात आलेला नाही. या सर्व बाबींची आयोग गंभीर दखल घेत आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देण्याकरिता एक महिन्याच्या कालावधी देण्यात येत आहे. प्रकरणात पुढील सुनावणी दिनांक ०७-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. या सुनावणीस सध्याचे जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना उपस्थित राहणे अनिवार्य राहिल. त्याचप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कंधार यांची कार्यालय प्रमुख या नात्याने उपस्थिती अनिवार्य करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०७-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०४-२०१२**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माधवराव बापुराव पवार, चेअरमन पांचाळपूर, पत्रकार सहकारी गृहनिर्माण संस्था, म. कंधार, रा. काटकळंबा, तालुका कंधार, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख गफार हबीब, : अपिलार्थी
रा. चिखली बु. तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१८९९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी कार्यालय, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३-०२-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०३-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मौजे चिखली बु. तालुका किनवट, जिल्हा नांदेड येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेला दिनांक ०१-०१-२००५ ते ३१-१२-२००९ पर्यंत मिळालेल्या अनुदानाबाबतच एकूण सात मुद्दयावर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००५ ते २००९ असा पाच वर्षाचा आहे. अपिलार्थी यांनी दिनांक २५-०१-२०१० च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना मिळाली नसल्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ०३-०३-२०१० अन्वये प्रथम अपील सादर केले आहे. त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही, याची गंभीर दखल आयोग घेत आहे.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०३-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०४-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख गफार हबीब, रा. चिखली बु. तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पुंडलीक गणपतराव ठाकूर,<br>सेवानिवृत्त मुख्याध्यापक, श्री. संत गाडगेबाबा पंचपुरा विद्यालय, माळेगांव (म.), विठाई निवास, शिवबानगर, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पुंडलीक गणपतराव ठाकूर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. वि. ना. जोशी, अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २८-०६-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी हे श्री. संत गाडगेबाबा पंचपुरा विद्यालय, माळेगांव (म.), तालुका देगलूर, जिल्हा नांदेड येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक आहेत. त्यांनी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे एकूण तीस मुद्दयांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. मागितलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो देण्यात आलेली नाही. तसेच त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांनी सुनावणी घेतलेली नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती व कालावधी विचारात घेता दोन दिवस निश्चित करुन माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार पाहणी देणे योग्य ठरत आहे.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी दोन दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या छायांकीत प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी दोन दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०४-२०१२**

------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पुंडलीक गणपतराव ठाकूर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक, श्री. संत गाडगेबाबा पंचपुरा विद्यालय, माळेगांव (म.), विठाई निवास, शिवबानगर, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रकाश ज्ञानोबा वाघमारे, : अपिलार्थी
रा. दत्तनगर, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, इस्लापुर,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९०१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, इस्लापुर,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, किनवट,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०७-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०-०५-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत कार्यालय, इस्लापुर, तालुका किनवट, जिल्हा नांदेड येथील "(१) इस्लापूर येथे हुतात्मा परिसरात लोकसहभागातून व्यापारी गाळे बांधण्यासंबंधी वरिष्ठ कार्यालयात पाठविण्यात आलेल्या संचिकेची सत्यप्रत, (२) जागेचा नकाशा, (३) कामाचे इस्टीमेट, (४) व्यापारी गाळे बांधण्यासंबंधी ग्रापंचायत ठराव, (५) सभासद धारकांची यादी व सभासद धारकाने कार्यालयात भरणा केलेल्या रकमेच्या पावत्या (६) हुतात्मा परिसरात अतिक्रमण असेल तर त्यांची यादी, (७) आपल्या कार्यालयाअंतर्गत फेरफार करण्यासाठी सन २००५ ते २०१० पर्यंत देण्यात आलेल्या अर्जदाराच्या कागदपत्राची सत्यप्रत, (८) फेरफार करण्यासंबंधीच्या ठरावाची सत्यप्रत, (९) बँक खाते बुक, (१०) ग्रामपंचायत सदस्यांची मासिक बैठक उपस्थितीपटची सत्यप्रत, अशी माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००५ ते २०१० असा आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर दिनांक १७-०५-२०१० रोजी ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, इस्लापूर, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांनी प्रथम प्रतिसाद देऊन जी माहिती देता येईल ती दिलेली आहे. त्यानंतर अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांनी दिनांक २०-०५-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यात यावी. यावर जन माहिती अधिकारी यांनी माहितीची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे माहितीसाठी रुपये १०,००० /- एवढी रक्कम लागत असल्याने व ही रक्कम ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नसल्याने रक्कम उपलब्ध झाल्यास माहिती मोफत देण्यात येईल, अन्यथा आपणास रेकॉर्ड बघावयाचे असल्यास ग्रामपंचायतीकडे रेकॉर्ड उपलब्ध आहे, असे दिनांक २१-०५-२०१० रोजी अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती व ग्रामपंचायतीकडील मनुष्यबळ व निधीची उपलब्धता विचारात घेता अपिलार्थीस विनामूल्य माहिती द्यावी हा प्रथम अपिलीय अधिका-यांनी घेतलेला निर्णय योग्य वाटत नाही. त्याऐवजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार पाहणी देणे यथोचित ठरत होते.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती, पंचायत समितीकडील निधीची उपलब्धता या सर्व बाबींचा विचार करता तसेच व्यापक स्वरुपाची माहिती संकलीत करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार ही बाब विचारात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार अपिलार्थीस पाहणी देणे योग्य ठरत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (j) नुसार माहितीची पाहणी देणे हा एक पर्याय आहे, माहितीची पाहणी दिली म्हणजे माहिती दिली असा त्याचा अर्थ होतो.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या छायांकीत प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश ज्ञानोबा वाघमारे, रा. दत्तनगर, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, इस्लापुर, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. सुरेखा चंपतराव पाटील, : अपिलार्थी
माजी जिल्हाध्यक्षा, महाराष्ट्र नवनिर्माण सेना महिला
आघाडी, रा. संभाजीनगर, तरोडा (बु.), नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर,
जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. यास्तव सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०७-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. सुरेखा चंपतराव पाटील, माजी जिल्हाध्यक्षा, महाराष्ट्र नवनिर्माण सेना महिला आघाडी, रा. संभाजीनगर, तरोडा (बु.), नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मामीलवाड गजानन व्यंकटराव,<br>मु. पो. तबेला गल्ली (पी. एस. आय. क्वार्टर मागे), मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३०-०१-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये " (१) शासकीय गोदामात दरमहा कोणकोणता माल येतो याचा तपशील व किती प्रमाणात येतो याची सविस्तर माहिती. (२) शासकीय गोदामात एकूण येणा-या मालापैकी स्वस्त धान्य दुकानदारांना किती प्रमाणात वाटप केला जातो त्याचा तपशील. (३) स्वस्त धान्य दुकानदारांना एकूण येणा-या मालापैकी त्यांनी सर्व कार्डधारकांना किती वाटप केली त्याच्या जानेवारी १९८९ पासून ते डिसेंबर २००९ पर्यंत तालुक्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानदार यांच्या वाटप रजिस्टरच्या प्रती किती कार्डधारकांना वाटप केला त्याची प्रत व त्यांचा संपूर्ण पत्ता. (४) स्वस्त धान्य दुकानदार यांचे महिन्याला किती दिवस दुकान चालू असते. उघडण्याची वेळ काय व बंद होताची वेळ किती आहे, " अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत.

आज रोजी सुनावणीस कोणीही उपस्थित नसल्यामुळे सद्यस्थिती आयोगास कळून येत नाही. अतः अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती व कालावधी विचारात घेता एक दिवस निश्चित करुन माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार पाहणी देणे योग्य ठरत आहे.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या छायांकीत प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही

आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मामीलवाड गजानन व्यंकटराव, मु. पो. तबेला गल्ली (पी. एस. आय. क्वार्टर मागे), मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. सुनिता पाटील बाभळीकर, : अपिलार्थी
रा. बाभळी (ध.), पो. मंगनाळी, तालुका धर्माबाद,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, धर्माबाद,
तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद,
जिल्हा नांदेड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९०४
२ सुनावणीची तारीख दि. २५-०४-२०१२
३ आज रोजीची उपस्थिती
३.१ अपिलार्थी - सौ. सुनिता पाटील बाभळीकर, : उपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, धर्माबाद,
तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड
- श्री. दिगंबर तुकाराम सोनटक्के
३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद,
जिल्हा नांदेड

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. २६-०४-२०१०
५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. १४-०५-२०१०

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३१-०५-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. २१-०६-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०८-०७-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी दिनांक २६-०४-२०१० च्या माहिती अर्जान्वये अंबादास गंगाराम बुध्दीवंत, स्वस्त धान्य दुकानदार, आलूर यांच्या दुकानास धान्य वाटपासाठी एकूण किती गावची दुकाने सलंग्न केली होती व त्या सर्व दुकानास कोणकोणत्या योजनेचे धान्य, माल, रॉकेल उचल केले आहे, ते लाभधारकांस वाटप केल्याबाबतची तपशीलवार, गावनिहाय, योजनानिहाय माहिती प्रमाणित करुन सत्यप्रतीत मिळावी. तसेच गावनिहाय योजनानिहाय लाभधारकास वाटप नोंदवहीच्या प्रमाणित सत्यप्रती व मागणीपत्रक सत्यप्रती द्याव्यात, अशी माहिती मागितली आहे. तथापि त्यांना अद्यापपावेतो माहिती देण्यात आलेली नाही. अपिलार्थी यांना संबंधित त्रयस्थाच्या स्वस्त धान्य दुकानाची कागदपत्रे जळाल्याचे दिनांक ०७-०७-२०१० रोजी कळविण्यात आले. तथापि त्यांनी मागितलेली काही माहिती तहसील कार्यालयात उपलब्ध होती ती आधी देणे आवश्यक होते परंतु ती माहितीही त्यांना देण्यात आलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात मागितलेली माहिती त्रयस्थ दुकानदाराकडे उपलब्ध असल्याने दिनांक १४-०५-२०१० रोजी त्यांच्याकडून ही माहिती मागविण्यात आली आहे व त्याची प्रत अपिलार्थीस देण्यात आली आहे. तथापि संबंधित त्रयस्थ दुकानदार यांनी दिनांक २५-०६-२०१० रोजी दुकानाचे रजिस्टर हे त्यांच्या काकाच्या घरी ठेवत असल्याने व त्याला आग लागल्यामुळे नष्ट झाले आहे, असे कळविले आहे व ही माहिती दिनांक ०७-०७-२०१० रोजी अपिलार्थीस देण्यात आली आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेली काही माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, धर्माबाद श्री. मंथावर यांच्याकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. जशी स्वस्त धान्य दुकान आलूर येथील दुकानास धान्य वाटपासाठी एकूण किती गावांची दुकाने संलग्न केली होती त्या सर्व दुकानांनी कोणकोणत्या योजनांचे रॉकेल, धान्य उचलले आहे व ही माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध कागदपत्रावरुन विहित मुदतीत देणे आवश्यक ठरत होते. त्यांनी तसे केल्याचे आढळून येत नाही. आज रोजी ही माहिती तहसील कार्यालय, धर्माबाद येथे उपलब्ध असू शकते. ती माहिती अपिलार्थीस विनामूल्य नोंदणीकृत टपालाने पाठविण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांनी करावी. अपिलार्थी यांनी मागितलेल्या

माहितीत व्यापक जनहित असल्याचे दिसून येत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सत्वर कार्यवाही करणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती न दिल्याने कलम ७ (१) चा भंग झाला आहे असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे रुपये २५,००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत तहसीलदार, धर्माबाद यांच्यामार्फत सादर करावा लागेल. संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही नोटीस तामीली करण्याची जबाबदारी तहसीलदार, धर्माबाद यांची राहील. त्याचप्रमाणे माहिती सार्वजनिक वितरण व्यवस्थेबाबतची असल्याने त्यामध्ये व्यापक जनहित आहे, ही बाब विचारात घेता स्वस्त धान्य दुकानाकडील कागदपत्रे कोठे ठेवावी, कशा पध्दतीने ठेवणे आवश्यक आहे, कागदपत्राच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती खबरदारी घ्यावी या सर्व बाबी विचारात घेऊन या प्रकरणाची चौकशी होणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता जिल्हाधिकारी, नांदेड यांनी संबंधित स्वस्त धान्य दुकानदार व तत्कालीन नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, धर्माबाद यांची चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करावी अशी शिफारस त्यांना करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना रुपये २५,००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत तहसीलदार, धर्माबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. सुनिता पाटील बाभळीकर, रा. बाभळी (ध.), पो. मंगनाळी, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोतीराम गयबु काळे, : अपिलार्थी

भारतीय जनता पार्टी, जिल्हा उपाध्यक्ष, किसान मोर्चा,

रा. जानापुरी, पो. वडेपुरी, एस. आर. टी. तालुका लोहा,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :

तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९०५

२ सुनावणीची तारीख दि. २५-०४-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड

- श्री. यु. एम. गडगीळे

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित

तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. १२-११-२००९

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सध्याचे जन माहिती अधिकारी नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास कागदपत्रे सादर केली. या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १२-११-२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्यासंदर्भात माहितीची एकूण १७ पृष्ठे अपिलार्थीस दिनांक १७-०४-२०१२ रोजी विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी सार्वजनिक अन्नधान्य वितरण व्यवस्थेबाबत माहिती मागितली आहे. सदरच्या माहितीमध्ये व्यापक जनहित असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत प्रतिसाद देणे आवश्यक होते. तथापि त्यांनी तसे केलेले नाही. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) नुसार ते शास्तीस पात्र ठरत आहेत. संबंधित जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड श्री. गाजुलवाड यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे रुपये २५,००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांच्यामार्फत सादर करावा या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही नोटीस तामीली करण्याची जबाबदारी तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांची राहील.

त्याचप्रमाणे सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नुकतीच माहिती पाठविली आहे. त्यात काही माहिती अपूर्ण असल्यास त्याबाबत अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. संबंधित जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड श्री. गाजुलवाड यांना रुपये २५,००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी

शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

२. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस पुढील पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोतीराम गयबु काळे, भारतीय जनता पार्टी, जिल्हा उपाध्यक्ष, किसान मोर्चा, रा. जानापुरी, पो. वडेपुरी, एस. आर. टी. तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख मुख्तार शेख नुरअली, : अपिलार्थी
रा. वजिराबाद,जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय,उपविभाग,नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अप्पर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - पोलीस उपअधिक्षक (गृह), नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अप्पर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.एस.एस. निंबाळकर, पोलीस निरीक्षक,स्थानिक गुन्हे शाखा | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९.०५.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी हे पोलीस विभागामध्ये नांदेड मुख्यालयात कार्यरत असून, त्यांनी दि. २२.०४.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये पोलीसस्टेशन वजिराबाद येथील एका तक्रार अर्जासंदर्भात माहिती मागितलेली आहे. सदरच्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक,नांदेड यांनी अपिलार्थीचा अर्ज कलम ६(३) अन्वये उपविभागीय पोलीस अधिकारी, नांदेड यांच्याकडे पाठवला असल्याचे कळविल्याचे दिसत आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी, नांदेड यांनी दि. १९.०५.२०१० रोजी प्रतिसाद देऊन कळविले आहे की, आपण मागितलेली माहिती कलम ८(जी) प्रमाणे देता येत नाही. यासंदर्भातील अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड यांनी सुनावणी घेतली, त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. या सुनावणीनंतर दिनांक ०२.०७.२०१० रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ४ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस देण्यात यावी, असा निर्णय दिला आहे. अपिलार्थी यांनी कार्यालयातून माहिती घेतली नसल्यामुळे देता आली नाही, असे आयोगास अवगत करण्यात आले. याकरिता मुद्दा क्र. १,२ व ४ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (गृह), नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख मुख्तार शेख नुरअली, पोलीस मुख्यालय, पोलीस वसाहत, घर क्रमांक २२ वजिराबाद, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (गृह),नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहियुद्दीन मोईनुद्दीन फारुकी, : अपिलार्थी
रा. तरोडा बु.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअधिक्षक अभियंता,
यांत्रिकी मंडळ (उ.स.), नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता,
यांत्रिकी मंडळ (उ.स.),नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहियुद्दीन मोईनुद्दीन फारुकी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ.स.), नांदेड- श्री. सुहास पंडितराव मांडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपअधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ.स.), नांदेड- श्री. रा.भु.कंदकूर्तीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि ०४.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०६.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला आहे. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात लिपीक म्हणून कार्यरत आहेत व त्यांनी त्यांच्या दि. ०६.०१.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये एकूण २३ मुद्यांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी दि. ०१.०१.१९७९ ते आजपर्यंत (माहितीच्या अर्जाच्या दिनांकापर्यंत दि. ०६.०१.२०१० पर्यंत) असा आहे. अपिलार्थी हे व्यक्तिशः माहिती घेणार आहेत. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. तथापि अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक अभियंता यांत्रिकी मंडळ (उ.स.), नांदेड यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीची एकंदर ६७ पृष्ठे अपिलार्थीस दिली आहेत. अपिलार्थीस ती मिळालेली आहेत. यामध्ये एकूण १६ मुद्यांवरील माहिती आहे. या संदर्भातील चार प्रकरणांमध्ये चौकशीची प्रक्रिया प्रगतीपथावर असल्यामुळे त्यासंदर्भातील माहिती देता आली नाही व मुद्दा क्र. १ ची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही, असे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपिलावरील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस अवगत करण्यात आले आहे.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ज्या परिस्थितीत उपलब्ध आहे, त्या स्वरुपात देणे आवश्यक आहे. संस्करण करुन देता येत नाही व अर्ज केला त्यावेळी जी स्थिती असेल, त्या स्वरुपातील माहिती पुरविणे आवश्यक आहे. चौकशी प्रक्रिया प्रगतीपथावर असल्यामुळे कलम 8(1)(h)अन्वये जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे माहिती देता आली नाही.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांचे प्रकरण या टप्प्यावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहियुद्दीन मोईनुद्दीन फारुकी,रा.नोमानियानगर, तरोडा,बु.,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता,यांत्रिकी मंडळ (उ.स.), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपअधीक्षक अभियंता,यांत्रिकी मंडळ (उ.स.), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हुंडेकर मोतीराम जिवबा, : अपिलार्थी
रा. वायपना (बु.), ता.हदगाव,जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हदगाव, जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकारी,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हदगाव,जि.नांदेड - श्री. डी.एस.देवतराज | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.बी.गहेरवार, उपकार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, भोकर, जि.नांदेड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१.०३.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९.०६.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले की,अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती दि. ०५.०२.२०१० रोजी पोस्टाद्वारे विनामूल्य पाठविण्यात आली आहे. माहितीकरिता एकंदर ₹७४/- खर्च झाले आहेत. ते संबंधित शाखा अभियंता यांच्याकडून वसूल करण्यात आले आहेत. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः दि. १३.०४.२०१० रोजी पुन्हा एकत्रित माहिती विनामूल्य स्वीकारली आहे. त्यासंदर्भातील पोच दिलेली आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हुंडेकर मोतीराम जिवबा, मु.पो. वायपना (बु.), ता. हदगाव,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हदगाव, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मधुकर जळबाजी कांबळे, : अपिलार्थी
रा. वाघाळा, पो.सिडको, ता.जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम
उपविभाग,भोकर,जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर,
जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -उप विभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकर, जि.नांदेड - श्री.एस.व्ही. तोटावार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.बी.गहीरवार, उपकार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये सार्वजनिक बांधकाम उपविभाग भोकर,जि.नांदेड अंतर्गत सन ऑक्टोबर २००८ ते ३१ एप्रिल, २००९ या कालावधीमध्ये केलेल्या विविध कामाबाबत विस्तृत अशी माहिती मागितली आहे. सदर माहिती मोठया व्याप्तीची असल्यामुळे माहिती देण्यास वेळ लागेल,अशी कल्पना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत देण्यात आली आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग भोकर, जि.नांदेड यांनी दि. १३.०४.२०१० रोजी अपिलार्थीस माहिती देण्यात यावी, असा निर्णय दिला आहे.

अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावरुन असे दिसून येत आहे की, त्यांनी एकूण चार मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. बहुतांश माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च)नुसार प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती, माहिती या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही, त्यामुळे देय होत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस खालील माहिती देय होत आहे.

मुद्दा क्र. १ संदर्भात उपअभियंता यांनी १०० टक्के तपासणी व कार्यकारी अभियंता यांनी ५० टक्के तपासणी केलेला अहवाल व

मुद्दा क्र. २ संदर्भात शाखा अभियंता, उपअभियंता यांनी प्राप्त केलेल्या डांबराचे बील, गेटपास (मूळ प्रतीनुसार) मोजमाप पुस्तिकेमध्ये डांबर प्राप्त झालेल्या तारखेस नोंदणी घेतल्याचा अहवाल त्याप्रमाणे लेखे समायोजित केले का, केल्यास तशी साक्षांकित माहिती.

ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग,भोकर, जि.नांदेड यांनी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत वर नमूद केल्याप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर जळबाजी कांबळे,रा. लुंबीनी वननगर, वाघाळा, पो.सिडको, ता.जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सोनकांबळे माधव लाडबा,<br>रा.पाटोदा (बु.),<br>ता.धर्माबाद,जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धर्माबाद, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम<br>विभाग,भोकर,जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सोनकांबळे माधव लाडबा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धर्माबाद, ता. धर्माबाद, जि.नांदेड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर,जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. व्ही.बी.गहेरवार, उपकार्यकारी अभियंता | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०५.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०३.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला आहे. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या विभागामध्ये प्राप्त निधी व खर्चासंदर्भात माहिती मागितली आहे. या संदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) नुसार अपिलार्थीस विहित मुदतीत दि. ३०.०४.२०१० रोजी जन महिती अधिकारी यांनी कळविले आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जास्त प्रमाणात असून त्यासाठी लागणारा खर्च-निधी त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही. तरी आपणास हवी असलेली माहिती कार्यालयात उपस्थित राहून पाहणी करण्यात यावी व निधी उपलब्ध होताच माहिती देण्यात येईल. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला दिसून येत नाही.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती द्यावी, असा निर्णय दिलेला आहे. त्यानुसार अपिलार्थीस दि. २१.०६.२०१० रोजी माहिती पोस्टाने पाठविण्यात आलेली आहे. यामध्ये २८६ पृष्ठे समाविष्ट आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोनकांबळे माधव लाडबा, मु. पो. पाटोदा बु., ता.धर्माबाद, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, धर्माबाद, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. पांडुरंग नारायण कदम,<br>रा.हस्तापुर,पो.हळदा, ता.भोकर, जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता (रजा व प्रशिक्षण),<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर,जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर,जि.नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअभियंता (रजा व प्रशिक्षण), सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर,जि.नांदेड - श्री. विजयसिंह बंडुसिंह गहेरवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०५.०१.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये सन २००८-०९ मधील भोकर डिव्हीजनमध्ये झालेल्या सर्वे कामाचे अंदाजपत्रक, रेकॉर्ड केलेल्या एम.बी.,स्टेटमेंट, फिल्ड बुक, एल सेक्शन, क्रॉस सेक्शन इ. माहिती व निवासी कर्मचाऱ्यांची माहिती मराठीतून मागितली आहे.

अपिलार्थी यांना प्रथम अपील निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांचेमार्फत दि. १३.०४.२०१० रोजी मुद्दा क्र. १, २ व ३ ची माहिती देण्यात आलेली आहे. माहिती विस्तृत स्वरुपाची व मोघम आहे. या माहितीकरिता सार्वजनिक बांधकाम विभागामधील भोकर, बिलोली,धर्माबाद, माहूर, किनवट विभाग क्र.१ व किनवट २ , तांत्रिक शाखा, भोकर,धर्माबाद,बिलोली,माहूर,किनवट-१ व किनवट-२, आस्थापना-१ या विभागांना दि. ०६.०१.२०१० रोजीच्या पत्राद्वारे माहितीचे संकलन करण्यासाठी कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांच्या मुद्दा क्र. १ मध्ये भोकर विभागातील सर्व कामांसाठी सर्वे केलेल्या कामांचे एल. सेक्शन,क्रॉस सेक्शन इ. माहिती समाविष्ट आहे. अशाप्रकारची विस्तृत स्वरुपाची माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. याकरिता अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना नेमक्या स्वरुपातील त्यांना आवश्यक असलेल्या एका विशिष्ट कामाबाबत माहिती मागणारा एक अर्ज नव्याने करणे योग्य ठरत आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्याचप्रमाणे माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे, त्या स्थितीत देय होत आहे. अत: एल.सेक्शन व क्रॉस सेक्शन इत्यादीची माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे त्याच स्थितीत अपिलार्थीस देय होईल, असे आयोगाचे मत आहे.

या सर्व बाबी पाहता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पांडुरंग नारायण कदम, मु.हस्तापूर, पो.हळदा,ता. भोकर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (रजा व प्रशिक्षण),सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सरकटे काशिराम रामजी, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहसंचालक, तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २५-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सरकटे काशिराम रामजी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना मिळाली नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २६.०५.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.२६.०५.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २५-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सरकटे काशिराम रामजी, मनार बिल्डींग, गाळा क्र.८, शासकीय तंत्रनिकेतन वसाहत, नांदेड

२. जन माहिती अधिकारी, सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०७-२०१०<br>फेरसादर दिनांक<br>१६-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलाबरोबर दिनांक १८-०३-२००९ आणि दिनांक २९-०८-२००९ असे दोन माहितीचे अर्ज जोडलेले आहेत. तसेच दिनांक २५-०२-२०१० चे प्रथम अपील जोडले आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या कोणत्या माहिती अर्जावर सुनावणी अपेक्षित आहे याबाबत स्पष्टीकरण होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपील परिपूर्ण नसल्यामुळे व व्दितीय अपिलाबरोबरची कागदपत्रे पूर्ण नसल्यामुळे त्यावर विचार करता येत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे व्दितीय अपील दाखल स्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पवार तानाजी भगवानराव, शारदा नगर, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संतोष बालाजीराव देशमुख, | : | अपिलार्थी |
| श्री. नृसिंह प्रसन्न, घर नं. ४०, विजय नगर, नाहौसो, नांदेड | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| कक्ष अधिकारी, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड<br>- श्री. समदुल्ला खान | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. ऐ. बी. लोणे, पशुधन विकास अधिकारी (तां.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०३-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०७-२०१० फेरसादर दिनांक १०-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी हे त्यांच्याच कार्यालयाचे कर्मचारी असून त्यांनी दिनांक १७-०३-२०१० च्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दिनांक १९-०३-२०१० च्या पत्रान्वये रुपये ६८ /- इतक्या शुल्काचा भरणा करावा म्हणजे माहिती देणे शक्य होईल असे लेखी कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यावर अपिलार्थीस जी माहिती उपलब्ध होती ती देण्यात आलेली आहे. उर्वरीत माहिती प्रथम अपील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थी यांनी याबाबत पोच दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक २७-०४-२०१० रोजी अपील निकाली काढण्याचा निर्णय दिला आहे. सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. आयोगा-पुढील कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २६-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष बालाजीराव देशमुख, श्री. नृसिंह प्रसन्न, घर नं. ४०, विजय नगर, नाहौसो,

नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बाबुराव नामदेव गबाळे,<br>रा. भवानी नगर, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लातूर लघुपाटबंधारे विभाग, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बाबुराव नामदेव गबाळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लातूर लघुपाटबंधारे विभाग, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एस. पी. कुलकर्णी, उप कार्यकारी अभियंता | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे मंडळ, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. सु. स. क्षीरसागर, प्रथम लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-११-२००९ |

६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. १९-१२-२००९

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. १६-०१-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी माहिती अर्जान्वये एकूण १३ मुद्दयांवर केकतसिंदगी, तालुका जळकोट येथील साठवण तलावा-संबंधी माहिती मागितली आहे. अपिलार्थीस माहिती मिळाली आहे तथापि त्यांना खालीलप्रमाणे माहिती मिळाली नाही.

१. कार्यकारी अभियंता यांच्या कार्यारंभ आदेशाच्या छायांकीत प्रती.

२. साठवण तलावासाठी वन व पर्यावरण खात्याने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची प्रत.

अपिलार्थी यांनी त्यांना विलंबाने माहिती मिळाली असल्याने त्यांनी भरलेले शुल्क त्यांना परत मिळावे अशी आयोगास विनंती केली.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०३-०१-२००९ च्या माहिती अर्जान्वये माहिती मागितली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०१-२००९ रोजी शुल्काचा भरणा करावा असे अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी यांनी सुमारे दहा महिन्यानंतर दिनांक २४-११-२००९ रोजी शुल्काचा भरणा केलेला आहे. त्यानंतर माहिती तयार ठेवण्यात येऊन दिनांक ३०-११-२००९ रोजी माहिती उपलब्ध आहे घेऊन जावी असे कळविण्यात आले आहे. कारण अपिलार्थी यांनी माहिती अर्जामध्ये ते माहिती व्यक्तिशः घेणार आहे असे नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यांना स्मरणपत्रही देण्यात आले. त्यानंतर दिनांक २१-१२-२००९ रोजी अपिलार्थी यांनी माहिती हस्तगत केली.

वरील सर्व बाबीवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत प्रतिसाद देण्यात आला आहे त्यामुळे कलम ७ (६) नुसार त्यांना विनामूल्य माहिती देण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी वर नमूद केलेल्या माहितीची कागदपत्रे आद्यापपावेतो त्यांना प्राप्त झालेली नाही याकरिता सदर माहिती त्यांना विनामूल्य देण्याची जन माहिती अधिकारी यांना व्यवस्था करावी लागेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २६-०४-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबुराव नामदेव गबाळे, रा. भवानी नगर, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लातूर लघुपाटबंधारे विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे मंडळ, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोहम्मद अन्वरउल्ला खान,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.<br>एस.एन.पेदापल्ली, प्रथम लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड - श्री. चं.व.तुंगे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. २९.०९.२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग,नांदेड यांच्या दि. ०१ मे २००८ ते ३०.११.२००८ या कालावधीची प्रवास दैनंदिनीची प्रत मागितली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग,नांदेड कार्यालयाकडे असल्यामुळे अपिलार्थी यांच्या या अर्जाची प्रत त्यांच्याकडे दि. ०३.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे वर्ग करण्यात येऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती संबंधितास पाठविण्याचे सूचित करण्यात आले. सदर माहितीकरिता ₹२८/- शुल्काचा भरणा करण्याबाबत दि. २७.१०.२००९ रोजी उपकार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग,नांदेड यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कळविलेले आहे. अपिलार्थी यांनी दि. २७.१०.२००९ रोजी शुल्काचा भरणा केल्यावर त्याच दिवशी अपिलार्थीस एकूण १४ पृष्ठांची माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती घेतली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्थितीत देण्यात आलेली आहे. कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी यांना सर्व माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २६-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहम्मद अन्वरउल्लाखान,प्लॉट नं. ९-४-४५५, कय्युम प्लॉटस्, नांदेड - ४३१

६०४.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. भवरे त्रिरत्नकुमार मारोतीराव,<br>रा. तरोडा (बु.), जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,हदगाव,जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भवरे त्रिरत्नकुमार मारोतीराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,हदगाव,जि.नांदेड - श्री. डी.एस.देवतराज | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९.०४.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला आहे. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०९.१०.२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"सा.बां.उपविभागीय कार्यालय हदगावतर्गत करण्यात आलेल्या सर्व कामाची तपसिलवार माहिती मिळणेबाबत मजूर योजना, त्याअंतर्गतची कामे, निधी, खर्च, शिल्लक राबविण्यात आलेल्या योजना त्या अंतर्गतची कामे, निधी शिल्लक असल्यास कारणे, काम करणारी यंत्रणा, नियंत्रित अधिकारी,कर्मचारी कामाचा सद्यस्थित दर्जा,क्षमता, प्रलंबित कामे (संपूर्ण) का असल्यास उपाययोजना इ.सह कामाचे सविस्तर अंदाजपत्रक,मोजमापपुस्तिका क्र. (सा.प्र.),कामावर भेटी देणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांची भेट पुस्तिका (सा.प्र.) वापरलेले वाहन क्र. त्यावरील खर्च,नोंदपुस्तिका इ.ची सविस्तर माहिती मिळणेबाबत तसेच एस.एस.पळशीकर, कन्स्ट्रक्शन्स् हि.नगर यांनी सां.बां.विभागामार्फत कामे कुठे केले त्या कामाची सविस्तर माहिती, प्रशासकीय मान्यता, आदेश गावाचे नाव, कामाचा प्रकार देण्यात आलेल्या आदेशाची (सा.प्र.)गुणनियमक पथकामार्फत करण्यात आलेल्या अहवालाची सत्यप्रत मिळणेबाबत."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अशाप्रकारची विस्तृत जवळजवळ संपूर्ण माहिती २००७ ते २००९ या कालावधीकरिता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हदगाव अंतर्गत मागितली आहे. सदरची माहिती मोठया प्रमाणात आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.

अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि. ०८.०४.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग,हदगाव,जि.नांदेड यांच्याकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता दि. १७.०५.२०१० रोजी कार्यालयीन कामकाजाच्या माहितीची पाहणी करावी व जी माहिती आवश्यक आहे, त्या माहितीच्या प्रती विनामूल्य घ्याव्या, असे अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत.

तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते व दि. २९.०४.२०१० रोजी निर्णय घेतला आहे की, अपिलार्थीस स्वखर्चाने माहिती तात्काळ देण्यात यावी.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती, ती देण्यासाठी लागणारे मनुष्यबळ व साधनसामग्री इ. बाबी साकल्याने विचारात घेऊन निर्णय दिलेला नाही, असे दिसून येत आहे. अशा परिस्थितीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीची पाहणी देणे योग्य ठरत होते.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी नेमक्या १-२ कामांची मोजकी माहिती पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना मागावी व पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी त्यासंदर्भात अपिलार्थीचा मूळ अर्ज विचारात घेऊन विनामूल्य माहिती द्यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,हदगाव, जि.नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २६-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भवरे त्रिरत्नकुमार मारोतीराव, "लक्ष्मीसदन", दिपकनगर, तरोडा (बु.),नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग हदगाव, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेषराव हिरामण पाटील,<br>मु. टेंभी, ता. हिमायतनगर,जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>विशेष समाजकल्याण अधिकारी कार्यालय,<br>नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विशेष समाजकल्याण अधिकारी,<br>नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक आयुक्त, समाजकल्याण, नांदेड -श्री. एम.बी.शेख | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एम.बी.शेख, प्र.समाजकल्याण अधिकारी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. ०९.०४.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये विशेष समाजकल्याण अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्याकडे वसंतराव नाईक ग्रंथालय व माहितीशास्त्र विद्यालय,कंधार या संस्थेस सन २००६ ते सन २००९ या वर्षामध्ये मिळालेल्या शिष्यवृत्ती व विद्यावेतनाबाबतची माहिती मागितली आहे. सदरची माहिती कलम ७(१) नुसार दि. १०.०५.२०१० रोजी अपिलार्थीस पाठविण्यात आली आहे. तथापि ती अपिलार्थीस मिळाली नाही, असे अवगत केल्याने दि. १७.०५.२०१० रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी पोच दिली आहे. या बाबी कागदपत्रांवरुन दिसून येत आहेत.

राज्य माहिती आयोग,औरंगाबाद खंडपीठासमोर अपिलार्थी यांचे पत्र दि. २४.०३.२०१२ रोजीचे आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, दि. ०९.०४.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झाली आहे. तरी द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी आयोगास विनंती केली आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांचे अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २६-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेषराव हिरामण पाटील, मु. टेंभी, पो. हिमायतनगर,ता. हिमायतनगर,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, समाजकल्याण,नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण कार्यालय, लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. निखाते संदिप विजय, : अपिलार्थी
रा. किनवट,ता.किनवट,
जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा समाजकल्याण कार्यालय,नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
समाज कल्याण अधिकारी (विशेष),
विशेष समाजकल्याण कार्यालय,नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. निखाते संदिप विजय | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | श्री. एम.बी.शेख, प्र.समाजकल्याण अधिकारी (वर्ग-२), कार्यालय सहायक आयुक्त, समाजकल्याण, नांदेड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व प्र.समाजकल्याण अधिकारी (वर्ग-२), कार्यालय सहायक आयुक्त, समाजकल्याण, नांदेड उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी आयोगास कथन केले की, त्यांनी दि. १०.०५.२०१० रोजीच्या त्यांच्या माहिती अर्जान्वये श्री साईबाबा शिक्षण संस्था, किनवट बाबतची माहिती सात मुद्यांद्वारे सन १९७६ पासून मागितली आहे. तथापि अद्यापपावेतो त्यांना माहिती मिळालेली नाही.

उपस्थित समाजकल्याण अधिकारी,वर्ग-२, कार्यालय सहायक आयुक्त, समाजकल्याण, नांदेड यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीचा अर्ज समाजकल्याण अधिकारी,नांदेड यांच्याकडे व प्रथम अपील अर्ज समाजकल्याण अधिकारी,विशेष समाजकल्याण कार्यालय,नांदेड यांच्याकडे केलेला आहे. तथापि अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जिल्हा समाजकल्याण अधिकारी, समाजकल्याण, जिल्हा परिषद,नांदेड (श्री. संजय कदम) यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केल्याचे दिसून येत नाही.

या सर्व बाबी पाहता, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19(8)(a) अन्वये आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार या प्रकरणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नांदेड यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आवश्यक ठरत आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. यासाठी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत व त्यासंदर्भातील प्रथम व द्वितीय अपील अर्जाच्या प्रतीसह प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. ११.०६.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निखाते संदिप विजय,रा.सरदारनगर, किनवट,ता.किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी, समाजकल्याण, जिल्हा परिषद,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नांदेड यांना (अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत व त्यासंदर्भातील प्रथम व द्वितीय अपील अर्जाच्या प्रतीसह) या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मुजाहिदऊल्ला सईदउल्ला,<br>रा. नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,<br>नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाज कल्याण अधिकारी, लातूर विभाग,लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मुजाहिदऊल्ला सईदउल्ला | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक आयुक्त, समाजकल्याण, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एम.बी.शेख, प्र.समाजकल्याण अधिकारी,वर्ग-२,नांदेड | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - प्रादेशिक उपआयुक्त, समाजकल्याण कार्यालय,लातूर | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. माडे डी.डी.,सहायक संचालक (वित्त व लेखा) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२.०३.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९.०५.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११.०८.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला आहे. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये राजे छत्रपती शाहू महाराज तेल धान्य प्रक्रिया सहकारी संस्था मर्या.,गायतोड, ता.हदगाव,जि.नांदेड या संस्थेचे वर्ष ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ व ०१.०४.२००८ ते ३१.०३.२००९ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल - अशी माहिती मागितली आहे. सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी या माहिती संदर्भात संबंधित संस्थेकडे पाठपुरावा करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घ्यावी असे अपिलार्थीस दि. १२.०३.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केलेली आहे.

या सर्व बाबी पाहता अपिलार्थीचे अपील या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुजाहिदऊल्ला सईदउल्ला,पाकीजा जनरल स्टोअर्स,देगलूर नाका, नांदेड-४३१ ६०४.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, समाजकल्याण, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त, समाजकल्याण विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कामाजी तुकाराम बनसोडे, : अपिलार्थी
रा. तरोडा (खु.),नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,
कंधार, जि. नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,तहसील कार्यालय, कंधार
जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, कंधार, जि. नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, कंधार जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. व्ही.एल.चव्हाण, नायब तहसीलदार(म.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने कथन केले की, अर्जदार यांनी दि. २०.०४.२०१२ रोजी त्यांना माहिती प्राप्त करुन दिली गेली असल्याचे लेखी त्यांच्या कार्यालयास दिलेले आहे. अर्जदाराची सद्यस्थितीत काही तक्रार नाही, तरी कृपया अपील निकाली काढण्यात यावे.

आयोगापुढे अपिलार्थी यांचे दि. २०.०४.२०१२ रोजीचे जन माहिती अधिकारी यांना माहितीसंदर्भात दिलेले पत्र आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, त्यांना संपूर्ण माहिती दि. २०.०४.२०१२ रोजी मिळाली आहे. तरी त्यांचा द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात यावा.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २६-०४-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कामाजी तुकाराम बनसोडे,द्वारा ४३, "दिपज्योती", उल्हासनगर,मालेगाव रोड, तरोडा (खु.),नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, कंधार, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय, कंधार,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहम्मद अब्दुल खुद्दुस जानीमियॉं. : अपिलार्थी
रा.धर्माबाद, जि. नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,
धर्माबाद, जि. नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,
तहसील कार्यालय, धर्माबाद,
जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,धर्माबाद, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. डी.टी.सोनटक्के, नायब तहसीलदार (निवडणूक) | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,धर्माबाद, जि. नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी सुनावणीच्या वेळी कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे अभिलेखे न्यायालयात दाखल असल्यामुळे आजपावेतो अपिलार्थीस माहिती देता आली नाही. त्या संचिका आता परत प्राप्त झाल्या आहेत. या सर्व बाबी पाहता, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन त्याबाबत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवून अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,धर्माबाद, जि.नांदेडयांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहम्मद अब्दुल खुद्दुस जानीमियॉ, कुंठा गल्ली, धर्माबाद, जि. नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,धर्माबाद,

जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय,धर्माबाद, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिगंबर गंगाराम डोईफोडे, : अपिलार्थी
रा. इज्जतगाव,पो.रुई बु.ता.नायगाव खै.,
जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,
नायगाव (खै.), जि. नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,
तहसील कार्यालय, नायगाव (खै.),
जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अव्वल कारकून (पु.), तहसील कार्यालय, नायगाव (खै.), जि.नांदेड - श्री. आर.एन.चौहान | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, नायगाव (खै.), जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २५.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | प्रतीवर तारीख नाही. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नायगाव (खै.), जि.नांदेड यांच्याकडे प्रकरण अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नायगाव (खै.), जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिगंबर गंगाराम डोईफोडे, मु.इज्जतगाव,पो.रुई बु.,ता.नायगाव (खै.), जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (पु.), तहसील कार्यालय, नायगाव (खै.), जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नायगाव (खै.), जि.नांदेड यांना अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेश बाबूराव चिखलीकर, : अपिलार्थी
रा. देगलूर, जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका पुरवठा अधिकारी,
तहसील कार्यालय,देगलूर,जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २५.०६.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ०४.०६.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये मे. बिरादार गॅस एजन्सीच्या संदर्भात घरगुती ग्राहक गॅस जोडणीबाबत माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांचा सदरचा अर्ज जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, देगलूर जि. नांदेड यांनी व्यवस्थापक, बिरादार गॅस एजन्सी, देगलूर यांना पाठविल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलावरुन सदरची माहिती गॅस एजन्सीने अपिलार्थीस दिलेली नाही, असे आढळून येत आहे. यासंदर्भात अपिलार्थी यांनी बिरादार गॅस एजन्सीशी संबंधित पेट्रोलियम कंपनी जसे हिंदुस्थान पेट्रोलियम अथवा इंडियन ऑईल कंपनी या प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज तसेच त्यांचे वरिष्ठ प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज सादर करणे आवश्यक आहे. या अधिनियमाअंतर्गत मूळ अर्ज तसेच प्रथम अपील अर्ज दाखल करण्यासाठी कंपनीच्या जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यासंदर्भात अधिक माहिती त्या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध होऊ शकते, असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेश बाबूराव चिखलीकर, पत्रकार, एकतानगर, भायेगाव रोड, देगलूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु),तहसील कार्यालय,देगलूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय,देगलूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.        निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. म. फारुक बाबु तगाले,<br>रा. किनवट,जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय,<br>किनवट, जि. नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, किनवट,<br>जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,किनवट, जि. नांदेड - श्री. व्हावळे बि.जे. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, किनवट, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०५.०५.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता त्यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, किनवट, जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. ०५.०५.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. म.फारुक बाबू तगाले, बाबा रमजान दरगाह मागे, किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.